॥ विद्याच् एवम् सर्व सिध्दी ॥

PK Foundation

Mission of Pratap Khandebharad

# प्रेरणा

## 2017 - 2018



P K Foundation's

# P K TECHNICAL CAMPUS, PUNE (CHAKAN)

Approved by AICTE, New Delhi, Affiliated to Savitribai Phule Pune University,
MSBTE & Recognized by Government of Maharashtra
( Unipune Id - IMMP019030 )

**www.pkinstitute.edu.in**

# Editorial Board



**Prof. Vaibhav Bhong**
Chief Editor

**Editorial Board**

**Prof. Kavita Ubale**
**Prof. Siddhi Sawant**
**Prof. Harshal Rahate**
**Prof. Poonam Thorat**
**Mrs. Amruta Butte**

**Printed By : Ganesha Studio, Chinchwad, Pune. Ph.: 7720073386**

The Editorial Board may not agree with the views mentioned on the articles published in this issue.

।। विद्याच् एवम् सर्व सिध्दी ।।

PK

Foundation

Mission of Pratap Khandebharad

## पी के फाऊंडेशन संचलित

**पी के स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रेन्स् (एम.आर.)**
**पी के इंटरनॅशनल स्कूल**
**पी के कॉमर्स अ‍ॅन्ड सायन्स ज्युनिअर कॉलेज**
**पी के टेक्निकल कॅम्पस्**

---

**मे. प्रताप खांडेभराड अर्थमुव्हर्स**
**पी के इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि.**
**पी के कन्स्ट्रोप्रोजेक्ट प्रा. लि.**
**पी के रेडीमिक्स कॉंक्रीट प्लॅन्ट**

# आमचे स्फुर्तिस्थान



## मा. श्री. प्रतापराव खांडेभराड

संस्थापक – अध्यक्ष

पी के फाऊंडेशन, पुणे (चाकण)

## सौ. नंदाताई प्रतापराव खांडेभराड

सचिव

पी के फाऊंडेशन, पुणे (चाकण)



## Vision - स्वप्न



लोक, समाज आणि राष्ट्र यामधील मानवता, वैशिष्टे आणि कौशल्ये यांचा भविष्यातील प्रगतीकरीता विचार करणारी व स्वत:च्या वर्तमानामध्ये व्यक्ती व समाजहित, राष्ट्रप्रेम व मानवतावाद जपणारी विलक्षण बुद्धीमान, सुसंस्कृत, प्रामाणिक, कष्टाळू तरूणाई घडविणे, की जी स्वत:च्या ज्ञानाच्या माध्यमातून समाजाच्या आर्थिक उन्नतीकरीता सतत कार्यमग्न राहून नवीन ध्येये, नवीन संकल्पना यांचा उपयोग समाज, राष्ट्र आणि मानव उत्पन्नाकरीता करतील.



## Mission : ध्येय

लाज, भीड, नीती, प्रामाणिकपणा, कष्टाळूपनणा सुटून देणारा नागरिक तसचे स्वयंरोजगार व उद्योजक घडविण्यांसाठी तरूणांची सुशिक्षीत, सुसंस्कृत पीढी तयार करणे. त्याचबरोबर त्यांच्या व समाजाच्या / देशाच्या सर्वांगीण विकास व आरोग्याकरिता तरूणांना सांस्कृतिक दृष्ट्या सक्षम व समृद्ध बनविणे.

## थेट अंत:करणापासून
## प्रिय विद्यार्थी, शिक्षक, पालक ..................... यांस सप्रेम नमस्कार !

मानवी जीवनामध्ये सर्वार्थाने यशस्वी होण्यासाठी व आनंदी जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक गोष्ट कोणती ? कि जी जीवनात यशपुर्ती ध्येयपुर्ती, कार्यसिध्दी करता मदत करते. तर ती गोष्ट म्हणजे दुसरे - तिसरे काही नसून 'शिक्षण' ही होय. उत्तम शिक्षण हेच समाज, राष्ट्र आणि मानवतेसाठीची उत्तम सेवा आहे. तसेच सर्व सुधारणा व सर्व समस्यांचं निराकरण करण्याच सामर्थ्य शिक्षणातच दडलयं. म्हणून आम्ही पी.के. फाऊंडेशन अंतर्गत चालणाऱ्या शिक्षण शाखांच्या माध्यमांतून, मुलांचा शैक्षणिक पाया मजबूत करत प्राथमिकते तंत्रशिक्षणासह पदव्युत्तर स्तरापर्यंतचे दर्जेदार शिक्षण समाजातील विविध घटकांपर्यत पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करित आहोत. तसेच या सुसंस्कृत देशाची सांस्कृतीक सिद्धता ही उपेक्षित – दुर्लक्षित, अंध, अपंग, मतिमंद, गतीमंदासह तत्सम घटकांच्या उन्नतीमध्ये सामावलेली आहे. म्हणूनच संस्थेमार्फत मोफत स्वरूपात मतिमंद मुलांची निवासी / अनिवासी शाळा चालवून त्यांना त्यांचा हरवलेला आनंद मिळवून देण्याचा प्रयत्न करित आहोत. अशा उद्दिष्टांकरीताच पी.के.फाऊंडेशन या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

शिक्षणाने माणसाच्या पोटापाण्याचा प्रश्न मिटतो. पण यशाच अतिउच्च शिखर गाठण्यासाठी शिक्षणाबरोबर संस्कार अतिमहत्वाचे असतात. 'संस्काराशिवाय शिक्षणाला अर्थ नाही ' या तत्वाशी मी संपूर्ण सहमत असून, विद्यार्थ्यांना अध्यापकांच्या माध्यमातून संस्कार, व्यावसायीक कौशल्य, समयसुचकतेच ज्ञान, देण्याचा प्रयत्न करतो आहे. मला केवळ पोशाखी विद्यार्थी बनविण्यात अजिबात स्वारस्य नाही. म्हणून येथे शिकणारा प्रत्येक विद्यार्थी ज्ञान व संस्काराच्या बाबतीत परिपुर्ण होवून, असेल त्या क्षेत्रात, त्याने जीवनातील यशाचे अतिउच्च शिखर गाठावे. हे एकमेव ध्येय मी माझ्या नजरेसमोर ठेवले आहे. येथील विद्यार्थ्याच्या अंगी फक्त तांत्रीक ज्ञान व सर्जनशील स्वभावच नाही तर त्याही पुढे तो एक उत्कृर्ष माणूस झाला पाहिजे. त्याला कर्तव्याची परिपूर्ण जाण व सामाजिक भान असायला हवे. ही माझी अपेक्षा आहे.

**आजचं गतीमान जीवन. कमी होत चाललेलं आर्युमान यांमुळे**
**संधीची वाट बघणारा नव्हे तर संधी निर्माण करणारा युवक निर्माण करणे.**
**तसेच**
**नैतिकतेचे अधिष्ठाण असणारा अत्यंत प्रामाणिक / सुसंस्कृत माणूस होण्यातच आपल्या**
**जीवनाची सार्थकता आहे. अशा उच्च ध्येयाने झपाटलेले विद्यार्थी घडविणे**
**त्याचबरोबर**
**बांधीलकी असणारे. समर्पीत वृत्तीचे शिक्षक बनविणे हे मी माझ्यासमोरील सर्वात मोठे आव्हान समजतो.**

यातूनच व्यक्तिचा व समाजाचा उत्कर्ष साधणे सहजशक्य आहे. यावर माझा सुपूर्ण विश्वास असुन, अशा उच्च ध्ययांसाठी, सर्व सोयी-सुविधांयुक्त असणारी, आमुची संस्था शैक्षणिक विश्वात सक्षमपणे वाटचाल करीत आहे. मनाच्या गाभाऱ्यात पेटुन ज्वाळा बाहेर पडलेल्या या शैक्षणिक यज्ञाविषयी अधिक जाणून घ्यावयाचे असल्यास आपण कधीही आमुच्या शैक्षणिक संकुलांस आवश्य भेट द्यावी.

**मा. श्री. प्रतापराव खांडेभराड**
संस्थापक - अध्यक्ष
पी के फाऊंडेशन, पुणे (चाकण)



# *From*
# *Director's Desk ...*

It gives me immense pleasure to know that P K Technical Campus is bringing out its college magazine "Prerana".

I am glad to learn that P K Technical Campus is going to publish the first issue of " Prerana".

I am very much thankful to our Hon'ble President Shri Prataprao Khandebharad & Hon'ble Secretory Sau. Nandatai Khandebharad for their constant support & encouragement.

I am confident that the article published in the magazine will be very useful & the readers will enjoy them. Besides making it a regular features the Editorial Board of the magazine should continue to improve the quality of the material selected for inclusion in the magazine & also actively involve students in managing its affairs.

I wish the publication a grand success.

**Dr. S.T. Singh**
Campus Director
P K Technical Campus, Pune (Chakan)



# From
# Principal's Desk ...

I am incredibly proud of our Editorial Board of Magazine Prerana 2017 - 18.

I feel happy to introduce our first college Magazine Prerana Issue for this A.Y. 2017 - 18.

Our Magazine Coordinator & Editorial Board member done their work dedicatedly & prove we are the best in Rural Area.

Annual Magazine " Prerana" which is a mirror of the academic and creative achiever of the college & students.

I take this opportunity to congratulate the our college Magazine editorial board & all the contributory for bringing out this issue in time Constant support & encouragement.

***All the best***

**Dr. S. K. Bodhe**
Principal
P K Technical Campus, Pune (Chakan)

# संपादकीय



प्रिय रसिक वाचकहो !
सविनय प्रणाम !

प्रेरणा ही नियतकालिका आपल्यासमोर सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. नियतकालिका हा कॅम्पसच्या प्रगतीचा आरसा असुन त्यामध्ये नाविण्यपुर्ण उपक्रमाबद्दल माहिती समाविष्ट असुन विद्यार्थ्यांचे प्रेरीत कार्य लक्षात येते. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा आविष्कार होण्यासाठी शिक्षण हे आवश्यकच असते. शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, विचारांची जडण–घडण होत असते. शिक्षण हे प्रगतीचे, विचारांच्या प्रसाराचे व समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. भारताला विकसनशील देशापासुन विकसित देश बनवताना शिक्षणाची महत्त्वाची भुमिका राहणार आहे. म्हणुनच याच विषयाला अनुसरून आम्ही या सदर अंकात आधुनिक भारतात युवकांचे योगदान हा विषय निवडला आहे.

नियतकालिका मधून केवळ कॅम्पसचीच माहिती दिली जात नाही तर विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या लेखन कौशल्याला वाव देण्याचे काम केले जाते. आपले विचार मांडणे ही व्यक्तीची गरज आहे आणि ती व्यक्त होण्याची संधीच विद्यार्थ्यांना या नियतकालिकामार्फत विद्यार्थ्यांना दिली जाते. विद्यार्थ्यांचा विकास व्हावा म्हणून कॅम्पसमध्ये विविध उपक्रम राबवत असतो. कॅम्पसच्या विविध उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग लक्षणीय आहे. स्पर्धेच्या युगात विद्यार्थी सर्वगुण संपन्न बनला पाहिजे. त्यासाठीच त्याला बोलता आणि लिहिता आले पाहिजे. म्हणुनच प्रेरणा या नियतकालिकेद्वारे संधी उपलब्ध करून देत आहोत.

संस्थेचे संस्थापक – अध्यक्ष मा. श्री. प्रतापराव खांडेभराड तसेच सचिव सौ. नंदाताई खांडेभराड, सर्व पदाधिकारी, कॅम्पस डायरेक्टर, प्राचार्य यांच्या कल्पक नेतृत्वामुळे आणि प्रयत्नांमुळे कॅम्पसचा विकास होतो आहे. नियतकालिका संपादन समिती, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी आणि गणेशा स्टुडीओ प्रिंटर्स यांच्या एकत्रित प्रयत्न आणि सहकार्यामुळेच हा अंक आज आपणासमोर सादर होत आहे. त्यामुळे त्यांच्या सहकार्याबद्दल या सर्वांचे आभार.

सर्वांच्या अथक प्रयत्नांतून हा अंक साकार झालेला आहे. तो तुम्हाला निश्चितच आवडेल अशी आशा व्यक्त करतो आणि हा अंक तुमच्या वाचनसाठी समोर ठेवतो.

**धन्यवाद !**

प्रा. वैभव भोंग



# छत्रपती शिवाजी महाराज

शिवरायांच्या वयाची पहिली सहा वर्षे फार धावपळीत गेली. पण या धावपळीतही जिजाबाईंनी शिवरायांना उत्तम शिक्षण दिले. सायंकाळी त्या सांजवात लावत. शिवबाला जवळ घेत, मायेने त्याला कुरवाळत, त्याला रामाच्या आणि कृष्णाच्या, भीमाच्या आणि अभिमन्यूच्या गोष्टी सांगत तसेच कधी ज्ञानेश्वरांचे, कधी नामदेवांचे तर कधी एकनाथांचे अभंग म्हणून दाखत. शिवरायांना शूर पुरूषांच्या गोष्टी आवडत. साधुसंतांची चरित्रेही त्यांना आवडत.



# स्वामी विवेकानंद

स्वामीजींच्या जीवनात आणि विचारात युवकांना खूपच महत्वाचे स्थान आहे. योगायोग म्हणजे आज १५० वर्षांनंतरही जगभरातील लोकांना प्रेरणा देण्याची शक्ती आणि ऊर्जा असलेल्या स्वामीजींची इहलोकीची यात्रा मात्र युवावस्थेतच पूर्ण झाली. वयाचे ४० वे वर्ष उलटले की प्रोढावस्था सुरू होते असे समजले जाते. साधारणपणे डोळ्यांवर चाळीशी (चष्मा ) चढते. स्वामीजींनी ४० वर्षेही पूर्ण केली नाहीत. ३९ वर्षे ५ महिने आणि २२ दिवस एवढेच लहानसे त्यांचे आयुष्य, पण पराक्रम एवढा उत्तुंग की, पुढची शेकडो वर्षे त्यांच्या जीवनाचा आणि विचारांचा आधार घेतला जावा.



# ए.पी.जे. अब्दुल कलाम

१९९० च्या प्रजासत्ताक दिनी मला ‘पद्मविभूषण’ या सन्मानाने गौरवण्यात आले. दहा वर्षांपूर्वी ‘पद्मविभूषण’ सन्मान मिळाला होता, त्या वेळच्या आठवणींना मला घेरून टाकले. मी त्यावेळी होतो, तोच होतो तसाच राहत होतो. दहा बाय बाराच्या खोलीत, पुस्तकांनी भरलेल्या कपाटांच्या संगतीने, त्या खोलीत कागद आणि अत्यावश्यक जुजबी भाड्याचे फर्निचर माझ्यासोबत तिथे होते.

# प्रेरणा

## प्रेरणा घ्या नावलौकिक केलेल्या व्यक्तिंच्या, ज्यांच्या हाती फक्त शुन्य होते.....

**डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम -**
वडील नावाडी होते. विद्यार्थीदशेत असताना ते वर्तमानपत्र विकत होते. ते शास्त्रज्ञ झाले राष्ट्रपती झाले.

**शेक्सपिअर -**
खाटीकखान्यात नोकरी करत होते. रात्री नाट्यगृहाच्या आवारात घोडागाडी सांभळता सांभळता एका नाटककाराचा जन्म झाला.

**ग.दि.माडगूळकर -**
मॅट्रिक नापास झाल्यावर उदबत्त्या विकल्या. अनवाणी आयुष्य जगले. त्यांनी गीतरामायण लिहिले..

**गुलजार -**
फाळणी नंतर दिल्लीला आले. मोटार गॅरेजमध्ये काम करायला सुरूवात केली. बिमल रॉय भेटले. मोटार गॅरेजमधले आयुष्य फिल्म इंडस्ट्रित आले...

**सुधीर फडके -**
चहा, भाजीचा व्यापार करत होते. प्रारंभीच्या काळात त्यांना पोटासाठी वाद्य विकावी लागली. भटकंतीतून त्यांनी सुर शोधला. ते गायक झाले, संगीतकार झाले.

**कर्मवीर भाऊराव पाटील -**
कंदिल आणि नांगराचे विक्रेते होते. कंदिल नांगर विकता विकता त्यांनी रयत शिक्षण संस्था निर्माण केली...

**चार्ली चॅपलिन -**
प्रचंड गरिबी अनुभवली विद्यार्थीदशेत फुले विकणयापासून अनेक कामे केली. आपल्या विनोदाने जगभरच्या लोंकाना हसवले...

**धिरूभाई अंबानी -**
वडील प्राथमिक शिक्षक होते. सासरे पोस्टमन होते. भाऊ रेशनिंग ऑफिसात नोकरीला होता. स्वत: ते पेट्रोल पंपावर क्लार्क म्हणून तिनशे रूपये पगारावर नोकरी करत होते. अशा वातावरणात स्वत:चे औद्योगिक साम्राज्य निर्माण केले...

**जॉनी वॉकर -**
बस कंडक्टर होता. प्रवाशांची तिकीटे फाडता फाडता त्याच्या सिनेमाची तिकीटे लोंकानी घ्यायला सुरूवात केली. एका तिकीटाचा प्रवास दुसऱ्या तिकीटावर स्थिरावला...

# अंतरंग

## मराठी विभाग


१) आई ! मला जन्म घेऊ दे ! .......... नेहा वाघमोडे (एफ.ई.)
२) शिक्षण .......... वैभव शिंदे (एफ.ई.)
३) एक तरी मुलगी असावी .......... वैभव शिंदे (एफ.ई.)
४) कणा .......... नेहा वाघमोडे (एफ.ई.)
५) शेगाव कचोरी .......... राहुल घेंगे (टी.ई.सिव्हील)
६) मधुरालिंगन .......... सुमित धायबर (टी.ई.सिव्हील)
७) प्रेमाचं सुंदर घर .......... स्नेहा कदम (बी.ई.सिव्हील)
८) एक दा तरी.....! .......... राहुल घेंगे (टी.ई.सिव्हील)
९) सांगशिल कधी .......... सुमित धायबर (टी.ई.सिव्हील)
१०) प्रीतरोग .......... सुमित धायबर (टी.ई.सिव्हील)
११) नाती काडीमोड झाली .......... अभिषेक ढमाले (टी.ई.सिव्हील)
१२) हळवे हळवे मन माझे .......... शुभम शिंदे (टी.ई.सिव्हील)
१३) तुजपीत मोहजाळ .......... अभिषेक ढमाले (टी.ई.सिव्हील)
१४) का ही स्त्री भ्रुण हत्या? .......... श्रेयस बोकारे (टी.ई.सिव्हील)
१५) कॉलेज कट्टा .......... श्रेयस बोकारे (टी.ई.सिव्हील)
१६) एकटी .......... समृध्दी पाध्ये (बी.ई.सिव्हील)
१७) जिथं तिथं तु...! .......... अभिषेक ढमाले (टी.ई.सिव्हील)
१८) खुप छान असतं हे बालपणं ...! .......... धनंजय बिरदवडे (टी.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा)
१९) भावनांची गरज .......... ज्योती महाळुंगकर (एस.ई.कॉम्प्युटर)
२०) गुलमोहर .......... ज्योती महाळुंगकर (एस.ई.कॉम्प्युटर)
२१) तुला कसं कळत नाही .......... ज्ञानेश्वर राठोड (बी.ई.सिव्हील)
२२) आई .......... अश्विनी पाटील (बी.ई.कॉम्प्युटर)
२३) जगावचं लागतं...! .......... धनंजय बिरदवडे (टी.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा)
२४) इंग्लिश VS मराठी .......... अश्विनी पाटील (बी.ई.कॉम्प्युटर)
२५) अजुनही मला आठवतंय .......... धनंजय बिरदवडे (टी.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा)
२६) विद्यार्थी .......... गुरूदास आवटे (बी.ई.मेकॅनिकल)
२७) वाटसरू .......... चेतन पडवळे (बी.ई.मेकॅनिकल)
२८) माझी माय .......... गुरूदास आवटे (बी.ई.मेकॅनिकल)
२९) उबग .......... गुरूदास आवटे (बी.ई.मेकॅनिकल)
३०) ती आणि मी .......... ज्योती महाळुंगकर (एस.ई.कॉम्प्युटर)
३१) सांग ना दादा .......... अविनाश आहेरकर (टी.ई.मेकॅनिकल)
३२) बरं केलं भल्लालदेवा .......... प्रशांत मांढे (टी.ई.मेकॅनिकल)
३३) तो एक बाप असतो .......... नागेश वाडेकर (एस.ई.मेकॅनिकल)
३४) तुझी साथ असताना .......... सागर पाचोडे (एस.ई.मेकॅनिकल)
३५) भाऊ खरच खुप आठवण येते रे तुझी .......... सागर पाचोडे (एस.ई.मेकॅनिकल)
३६) भावना .......... कुणाल पाटील (बी.ई.मेकॅनिकल)
३७) असे जगावे .......... प्रशांत मांढे (टी.ई.मेकॅनिकल)
३८) सांग ना ग आई तिचा काय गुन्हा ? .......... सागर पाचोडे (एस.ई.मेकॅनिकल)

३९) माझ्या कवितेसाठी........ कुणाल पाटील (बी.ई.मेकॅनिकल)
४०) शून्य ........ अनिकेत याचकल (बी.ई.मेकॅनिकल)
४१) आयुष्य ........ अनिकेत याचकल (बी.ई.मेकॅनिकल.)
४२) अपघात ........ कुणाल पाटील (बी.ई.मेकॅनिकल)
४३) तिच्या न जन्मलेल्या आईस ........ विजय भोरसले (एम.बी.ए.)
४४) आठवणीतलं PK कॉलेज ........ भाऊसाहेब देवढे (बी.ई.मेकॅनिकल)
४५) सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकलेली युवापिढी ........ करिश्मा कदम (बी.ई.सिव्हिल)
४६) स्त्री आणि शिक्षण ........ मयुर नाणेकर (बी.ई.कॉम्प्युटर)
४७) भारताच्या विकासातील तरूणांची भुमिका ........ सारंगे सतिश (टी.ई.सिव्हील)
४८) भारतीय संस्कृती आणि विज्ञान ........ नितेश येडे (बी.ई.सिव्हील)
४९) आधुनिक भारतात युवकांचे योगदान ........ राहुल कोके (टी.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा)
५०) भारताच्या विकासातील तरूणांची भुमिका ........ संकेत कल्याणकर (टी.ई.सिव्हील)
५१) बेटी बचाओ, बेटी पढाओ ........ प्रतिक कड (टी.ई.सिव्हील)
५२) भारतीय संस्कृती आणि विज्ञान ........ अक्षय हुंडारे (एस.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा)
५३) कल्पना सुंदर भारताची ........ नागेश वाडेकर (एस.ई.मेकॅनिकल)
५४) मुली वाचवा मुली शिकवा ........ नितेश शिवशेटे (एस.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा)
५५) बेटी बचाओ – बेटी पढाओ ........ तेजस्वी वाघचौरे (टी.वाय.कॉम्प्युटर,डिप्लोमा)
५६) किल्ले संवर्धन ........ विजय शिंदे (टी.ई.सिव्हील)


## हिंदी विभाग


१) बेटी बचाओ, बेटी बढाओ ! ........ नागेश पाटवार (बी.ई.कॉम्प्युटर)
२) दर्द और दौलत ........ रेश्मा कड (एफ.ई.)
३) जिंदगी ........ मोहित सुर्यवंशी (टी.ई.मेकॅनिकल)
४) मेरी प्रेमकहाणी ........ राहुल बदनापुरकर (एस.ई.सिव्हील)
५) जिंदगी ........ रेश्मा कड (एफ.ई.)
६) मेरा कॉलेज ........ राहुल बदनापुरकर (एस.ई.सिव्हील)
७) जिंदगी की सच्चाई ........ रेश्मा कड (एफ.ई.)
८) जीवन के तीन पडाव ........ रेश्मा कड (एफ.ई.)


## English Section


1) Save Girl & Educate Girls ........ Aniruddha Nawtake (T.E. Civil )
2) OF Collage Life ........ Vaibhav Shinde (F.E.)
3) My India ........ Sumita Bhalke (T.E.Civil)
4) Importance of Girls Education ........ Aniruddha Nawtake (T.E.Civil )
5) Slogens ........ Nagesh Patawar (B.E.Computer)
6) A Mother ........ Aniruddha Nawtake (T.E.Civil )
7) Youth & Social Media ........ Shreeyash Reddi (F.E.)
8) Role Of Youth In Development Of India ........ Anand Bagate (F.E.)
9) Engineering ........ Vishal Giri (F.E.)
10) Impact of Social Media On Youth ........ Sumita Bhalke (T.E.Civil)
11) Importance to learn English ........ Dattaprasad Ubale (T.E.Civil)
12) Life Is Like That ........ Prof. Pathan M. H. (Diploma Department)
13) Role Of Youth In Development Of India ........ Prof. Monika Ghodekar (Dip. Department (Comp.))
14) Tips for Personality Development ........ Prof. Pathan M. H. (Diploma Department)


## Departmental Annual Reports



# मराठी विभाग



# आई ! मला जन्म घेऊ दे !

तू पाहिले जग मला देखील पाहू दे
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ।। धृ ।।
परमेश्वर प्रत्येकाच्या घरी जाऊ शकत नाही
त्याच्या जागी तू आहेस कसे तुला कळत नाही
ताईसवे माझ्या मला आनंदाने न्हाऊदे

सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ।। १ ।।
हुंडा लागतो मोठा म्हणून त्रास माझा वाटतो का ?
झरा तुझ्या मायेचा म्हणून असा आटतो का?
राखीसाठी दादाच्या निदान मला येऊ दे
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ।। २ ।।

तू बहीण तू कन्या तू एक स्त्री आहे
काल जिथे तू होती आज तिथे मी आहे
तू जसे विणले नाते तसे मला विणू दे
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ।। ३ ।।

पहा मग फिरून मी पुन्हा कधी येणार नाही
भाग्य कन्यादानाचे दोघांनाही देणार नाही
डोळे येता भरून तुझे पदर मला होऊ दे
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ।। ४ ।।

नेहा वाघमोडे
एफ. ई.



# शिक्षण

शिक्षणाने घडविले आम्हा
सृजनतेचे दिलेत धडे
देश घडविण्या गरज आपुली
शैक्षणिक पाऊल पडते पुढे

शिक्षण घेऊनी पुढती जाऊ
या भारताची आपण शान
महासत्तेचे फेकून जाळे
वाढवू भारताचा मान

शिक्षणाने करूया आपण
प्रगत प्रगत भारत देश
दावूनी देऊ परकियांना
सुशिक्षिततेचा आपुला देश

शिक्षण घेऊनी प्रगत व्हा रे
ओढा काळ्या दगडावरी पांढरी रेघ
अरे गरजतील स्वागत आपुल्या
ओथंबलेले काळे मेघ....

वैभव शिंदे
एफ. ई.



# एक तरी मुलगी असावी


एक तरी मुलगी असावी
उमलताना बघावी
नाजुक नखरे करताना
न्याहाळायला मिळावी ।।

एक तरी मुलगी असावी
साजिरी गोजिरी दिसावी
नाना मागण्या करताना
तारांबळ माझी उडावी ।।

एक तरी मुलगी असावी
जवळ येऊन बसावी
मनातली गुपितं तिने
हळुच कानात सांगावी ।।

एक तरी मुलगी असावी
निदान सुनेच्या रूपात मिळावी
लेकीची कसर तिने
थोडीतरी भरून काढावी ।।

वैभव शिंदे
एफ. ई.



# कणा

' ओळखलंत का सर मला ' पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले केसांवरती पाणी
क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून
'गंगामाई पाहूणी आली, गेली घरट्यात राहून
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी–बायको मात्र वाचली
भिंत खचली चूल विझली होते–नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले
कारभारणीला घेऊन संगे सर, आता लढतो आहे'
पडकी भिंत बांधतो आहे, चिखल–गाळ काढतो आहे,
खिशाकडे हात जाताच हसता हसता उठला,
'पैसे नको सर, जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा'

नेहा वाघमोडे
एफ. ई.

(कवी कुसुमाग्रज काव्य संग्रहातुन)

# शेगाव कचोरी

(चाल : सोनु तुझा माझ्यावर भरोसा नाही का?)

सोनु तुझा शेगाव कचोरीवर
भरोसा नाही का?
कचोरीचा आकार कसा गोल गोल
सोनु तु माझ्याशी गोड बोल
सोनु तुला शेगाव कचोरी वर भरोसा नाय का?

सोनु तुझा शेगाव कचोरीवर
भरोसा नाही का?
कचोरीची चव कशी टेस्टी
सोनु ला आवडते चटणी
चटणीचा रंग कसा लाल लाल
सोनु तु माझ्याशी गोड बोल

सोनु शेगावची गाडी
आता चालली.... चालली....
सोनु तु गाडी मध्ये बस बस
मंदीराचा आकार कसा गोल गोल
सोनु तु माझ्याशी गोड बोल

सोनु मंदीराच्या कळसाला झेंडा
झेंड्याचा रंग कसा लाल लाल
सोनु तुझा शेगाव कचोरी वर
भरोसा नाही का?

राहुल घेंगे
टी.ई.सिव्हील

# मधुरालिंगन

होरपळलो श्वासात तुझ्या
पोहचाव्या लाटा सागरतीरी
नी हळुच स्पर्शावे रेतीला
ओझरता हा अनुभव जरी

पांघरले तुजला धुंदीत
आज माझ्या भोवती
गोड सुगंध दरवळला
जणु रातराणीसवे शेवंती

स्तब्ध उबेत तुझ्या मी
येई नकळत ओठ हे जवळ
बाहुपाशांत ठार अडकलो
या मधुरालिंगनात मला आवळ

सुमित धायबर
टी.ई.सिव्हील

# प्रेमाचं सुंदर घर



पावला पावला गणिक, टोलेजंग इमारती
त्या उंचीहुनही समाजात, मान तुझी वरती
दरी खोऱ्यांशी मैत्री करून, काढली आहेस वाट
बदलतोयस तु जग सारे, काही वेगळाच तुझा थाट

तु शिकवतोयस मोकळेपणातील,
एक आकृतीबंध जीवन
तु बांधतोयस एकत्र, निसटत चाललेला
इथला प्रत्येक क्षण
तु साकारतोयस नव्याने एक सुंदर पहाट
बदलतोयस तु जग सारे, काही वेगळाच तुझा थाट

उन्हातान्हात रचला गेलाय
तुझा सुंदर पाया,
इंद्रधनुच्या रंगासवे तुला
आकाशाची छाया
तुला साद देऊन जातेय, समुद्राचीही लाट
बदलतोयस तु जग सारे, काही वेगळाच तुझा थाट

मात्र माणसा माणसा मधला पूल
हल्ली ढासळतच चाललाय
मटेरीअलच खराब होतं की,
कि नवीन माल आलाय?
तुला बांधायचीय तंत्रज्ञानाशी माणुसकीची गाठ
बदलतोयस तु जग सारे, काही वेगळांतच तुझा थाट

तु पाण्यातही तरवलंयस, तु आकाशातही उडवलयस
जिथे नव्हत काहीच, तिथे बरचं काही घडवलयस
तरी तुझ्याच नावावर खपतोय का भ्रष्टाचार भन्नाट
बदलतोयस तु जग सारे, काही वेगळाच तुझा थाट

आता तरी थोडा बदल, स्वत:ला आण भानावर
आशेच्या विटा रचत जा, निराशेच्या माळरानावर
मग झाडं तोडावी लागणारच नाहीत
ना जंगल होणार न सपाट
बदलतोयस तु जग सारे, काही वेगळाच तुझा थाट

तुच बांधलेल्या रस्त्यांवर बघ
आज जग सारं धावतंय
तुझ्या कलेच्या भिंतीमध्ये बघ
स्वप्न जगाचं मावतय
मार्ग तुझा खडतर जणु वळणावळणांचा घाट
बदलतोयस तु जग सारे, काही वेगळाच तुझा थाट

सार काही उभारलंय
तु एक सिव्हील इंजिनिअर
मग प्रत्येकाच्या मनातंही बांधशील का
प्रेमाचं सुदर घर
तेव्हाच मग दिसुन येईल, शक्ती तुझी अफाट
बदलतोयस तु जग सारे, काही वेगळाच तुझा थाट

स्नेहा कदम
बी.ई.सिव्हील



# एक दा तरी.....!

एकदा तरी आयुष्यात कुणी असे भेटावे...
ज्याला आपल्या मनातले सर्व काही सांगावे
सांगता सांगता आयुष्य पुर्ण सरून जावे
आणि सरतानाही आयुष्य पुन्हा पुन्हा जगावे
ज्याला घेऊन सोबतीने खुप खुप चालावे
चालता चालता दुरवर खुप खुप थकावे
पण थकल्यावरही आधारासाठी त्याच्याकडेच पाहावे

एकदा तरी आयुष्यात कुणी असे भेटावे...
दु:ख त्याचे आणि अश्रु माझे असावेत
सोबतीने त्याच्या खुप खुप रडावे
आणि अश्रुच्या हुंदक्यात सर्व दुख: विसरावे
आनंद त्याचा आणि हसु माझे असावे
त्याच्यासाठी मी जगतच राहावे जगतच राहावे
आणि त्याच्यासाठी जगतानाच आयुष्य संपावे

एकदा तरी आयुष्यात कुणी असे भेटावे...
ज्याच्या सोबतीतल्या प्रत्येक क्षणाणे सुखवावे
उन्हात त्याने सावली तर पावसात थेंब व्हावे
आणि मायेच्या थेंबानी मी पुर्ण भिजून जावे
एकदा तरी आयुष्यात कुणी असे भेटावे...

राहुल घेंगे
टी.ई.सिव्हील



# सांगशिल कधी

तुझे हे खोटे बोलणे
मला वाटते अगदी खरे
खरे खोटे काय ते तुला माहीती
पण मला वाटते अगदी बरे !!

एकदा वाटल चंद्रावर कविता करावी
पण तुझ्या गालावरची कळी
मला मात्र भुलवून गेली !!

एकदातरी कळेल तुला
जशी आहेस तू तसाच आहे मी
अन् जसा आहे मी तशीच आहेस तू !!

त्या दिवसाची वाट पाहील
त्या दिवशी तू मला सांगशिल
तुझीच आहे मी अन्
माझाच आहेस तू !!

सुमित धायबर
टी.ई.सिव्हील



# प्रीतरोग

उरलेला माझा श्वास निसटला
हास्यानन तु पाहीले जेव्हा
कळले नाही कसा अचानक
ह्दयाचा ठोका उमलला केव्हा

हरवुन गेले सारे शब्द माझे
पोरका मी असे या या शब्दांविना
स्पर्शाने या आलोय शहारून
गीत प्रेमाचे हे सुरतालविना

प्रीत रोग जडला मजला
चुर मनाचा झाला आरसा
मुकबधीर जणु झालो मी
भानावर ना राहिला फारसा

सुमित धायबर
टी.ई.सिव्हील

# नाती काडीमोड झाली

ज्यांना मानिले सख्याहुनही
मज आपुले तेच
झाले मज हाडाचे वैरी
खुपसायचेच होते खंजीर
मग का खेळ खेळविलास असा
का मज मनाचा डाव मोडीला तु असा?

काय केला मी असा गुन्हा
जो तु खोटेपणाचा डाव मांडिला असा
सांग ना ! का खेळ खेळविलास असा
का मज मनाचा डाव मोडिला तु असा?

कुठे पाप फेडशील इतकी
वाटले न मजला
धुर्त असशील एवढी
सांग ना ! का
खेळ खेळिलास असा
का मज मनाचा डाव मोडिला तु असा?

अभिषेक ढमाले
टी.ई.सिव्हील

# हळवे हळवे मन माझे

सकाळी सकाळी कॉलेजला येताना
सुंदर चेहरा तुझा दिसला
हळवे हळवे मन माझे
जनू ह्दयात बाण घुसला
ना वादळ, ना वारा
जनू हिरव्या रानात मोर दिसला

भिर भिर नारी नजर तुझी
सोबतीला तुझा चेहरा हसरा
हळवे हळवे मन माझे
जनू ह्दयात बाण घुसला

मला शोधणारी चोरटी नजर
समोरी मी दिसताच तुझा नुसताच अबोला
अन् हळवे हळवे मन माझे
जनू ह्दयात बाण घुसला

असेच एका दिवशी
तुझे रस्त्यावरती भेटण
स्पर्श न करता नेहमीसारख नजरेण खेटण
हातात तुझ्या होता काहीतरी नजराना
वाटल मला असाव प्रेमपत्र आपल
तुझे शब्द तेच होते बस झाली
नजरा नजर आता सगळं विसरा
तुझी लग्नपत्रिका पाहून माझ्या
ह्दयात बाण घुसला

सकाळी सकाळी कॉलेजला येताना
सुंदर चेहरा तुझा दिसला....

शुभम शिंदे
टी.ई.सिव्हील



# तुजपीत मोहजाळ

जरी नसलो मी गडगंज
नसलो मी धनवान
तरी तुझिया ठेविले
असते सर्दैव सुखी
का तुजला एवढी संपत्तीची मोहमाया
नाही आयुष्यभर पुरणार तुला
ही कुबेराची मोहमाया

आहे ही दुनिया लबाड सारी
गुंतशील तु यात एकदिवशी
सांग ना प्रिये कसा
समजावु मी तुला ?
नाही पुरणार तुला ही
कुबेराची मोहमाया

जरी खेळशील पैशात खुपसारी
स्मरण होईल तुजला मी एकदिवशी
नाही ही धन दौलत चांगली
सांगितले मी कितीदा वेळी

अभिषेक ढमाले
टी.ई.सिव्हील

# का ही स्त्री भ्रुण हत्या ...



ही एक मुलीची गोष्ट
आज मी सांगणार नाही....
अश्या रोजच्या करोडो मुली असतील
त्यांच्या बद्दल बोलतो....

ती जन्माला आली असती तर
कुठल्या तरी घरचं भाग्य उजळल असतं
खरचं आज ती जन्माला आली असती तर
तिचं नाव काय असत.... ते तरी नाही माहिती
पण आजकालच्या तरुणांनी नक्की
तीच काही ना काही नाव ठेवल असतं
पण तिला ते नावं मिळण्यापूर्वीच
तीचं जगणं संपत.....
का त्या चिमुकलीच जीवन एवढं छोटं असतं

होत राहील अशीच निरपराधी स्त्रीची हत्या
तर मिळेल कशी प्रेम देणारी एक आई
लाभेन का प्रेमळ पत्नी आणि ताई
अन् ती आजी रोज गोष्ट सांगणारी
का छळता येऊद्या जगात पाहूद्या ना तिला ही दुनियादारी

काय ते म्हणतात न
मुलगा मुलगी एक समान
मग का नाही वाढू देत या जगात मुलीचं प्रमाण
येऊ तर द्या तिला ह्या विश्वात
अजुन तिला जग पाहायचंय
दुष्टांशी लढून तिला स्वत:ला जिंकवायचंय
सगळ्यांना सोबत घेऊन तिला हा देश एकजुट करायचंय

मग का नाही येऊ देत तिला या विश्वात .... का?
कारण ती एक मुलगी आहे?
अरे थोडा इतिहास डोकावून पहा
तर समजेन स्त्री हीच एक जात आहे
ज्यामुळे आपण जगलो बचावलो
सामर्थ्यांनी उभे राहीलो
कारण ती स्त्री जीवनाची एक शिल्पकार आहे.
कारण तीच एक प्रबळ शक्ती आहे.

नका रे तिला मारू तिच्या मायेच्या गर्भात
तीच आयुष्य तर आपल्याला वाढवायचंय
विचार करा ना थोडा जग किती पुढे जातयं
का आपण एव्हढे नीच होत चाललोय?
का आपण आपला दर्जा खालावतोय?
आणि का आपण माणूस असुन नरभक्षक बनंतोय?

तिचा जन्म तर होऊ द्या तिला बाहेर पाडायचयं
तिला पण आईची माया आणि बाबांच प्रेम घ्यायचयं
तिला पण तिच्या भावची बहीन व्हायचयं
तिला पण कोणाची तरी प्रेयसी बनायचंय
आणि आई बनुन परत तिला तिच्या मुला-मुलीला वाटायचयं
होऊद्या एकदा तिचा जन्म तिला खुप काही बदलायचं

बस शेवटी एव्हढंच म्हणतो...
निसर्गाचे नियम पाळा
होऊ द्या मुलगी तिला लळा लावा
स्त्री भ्रुण हत्या टाळा
आणि आपली माणुसकी सांभाळा

श्रेयस बोकारे
टी.ई.सिव्हील

# कॉलेज कट्टा ...

कट्ट्यावर मुलांची मैफिल असते
मैफिलीमध्ये गप्पांची संगत असते
कट्ट्यावर पण बसायला तिथे कायम राहायची Daring करावी लागते
नाही तर Class मध्ये बसून
Boaring Lectures ला सडावं लागते...



कट्ट्यावर बसुन कॉलेज मधल्या
सुंदर – सुंदर मुलींना पाहण्याची एक इच्छा असते
पण तिला मात्र कायम हवेत उडायची सवय असते
आणि तिला पाहुण गाणं म्हणण्यात एक वेगळीच मज्ज्ञा असते
मग तीने एकदा तरी वळून पाहावं
अशी सर्वांच्या मनी दाट इच्छा असते...

कॉलेजमध्ये येणाऱ्याला फॅशन करणं जमावं लागते
नाहीतर कट्ट्यावरच्या मैफीलीचा मामु बननु राहवं लागते
कट्ट्यावरच्या मैफिलीमध्ये कोणीतरी पप्पु असावा लागतो
कारण सततं Fail होऊन
कट्ट्यावर बसण्याचा त्याचाच खरा मान असतो

कॅन्टीनचा चहा पिल्याशिवाय मैफिलीत रंग भरत नाही
आणि धिंगा मस्ती करण्यासाठी Energy ही मिळत नाही
पण हा साला कॅन्टीन वाला ना, चहाच नीट बनवत नाही
कधी पाणीच जास्त असत, तर कधी साखरच टाकत नाही

चहा पिऊन कॅन्टीन मधून बाहेर पडल्याने
मैफिलीमधला एक तरी असा असतोच जो म्हणतो
'' भावा आई शपथ ती तुझ्याकडेच बघत होती ''
आणि मग वळून पाहिल्यावर समजत यार
कालच्या पेक्षा आज ती खुप भारी दिसत होती...

खरचं कॉलेजच्या कट्ट्यावरची मैफिलच वेगळी असते
आणि त्या मैफिलीमध्ये गप्पांची संगत सतत अशीच सुरू असते...

श्रेयस बोकारे
टी.ई.सिव्हील



# एकटी

दिसते मी एकटीच, जेव्हा असते मी एकटी
जरी जग असते सोबतीला, तरी मन एकटेच भटकत जाई

मनी विचार येतो जेव्हा, असते मी सर्वांपरी
जगास दिसते आनंदी, परी मनात दुःखी राही

मज कळली जगाची रीत, परी मन उमजून घेत नाही
स्वप्नांच्या या दुनियेत, मन उगाच शोधत राही

जगी दिसते द:ख अनंताचे, मन स्वत:स विसरून जाई
जग आले जरी जवळ, तरी माणसे दुर जाई

नात्यांच्या या बाजारात, फक्त उरला स्वार्थी सुर
सुरात सुर मिसळूनी, फक्त उरला स्वार्थी नूर

नरजन्मा येऊनी सांगते, एक दुःखी मन
शब्दांचा हो खेळ सारा, शब्द वापरा जपून

शेवटी एकच विनंती, नाती जपा मनातून
मनुष्य जन्म श्रेष्ठ मानीला, सर्व जन्माहून


समृध्दी पाध्ये
बी.ई.सिव्हील



# जिथं तिथं तु...!

माझ्या मनात तु, माझ्या ह्दयात तु
जिकडं पाहतो, तिथं दिसते तु
तुला पाहुनी गं, मन होते माझे तृप्त
मग वाटते मला, चिंब भिजावे तुझ्यात
कासावीस हाते मन, जीव गुंतला तुझ्यात
जीव झाला माझा वेडापिसा, कसा जणु तुझ्याविना
तग तुच सांग आता, कसा जगु तुझ्याविना
तुजला पाहण्यासाठी दिस, खर्ची घालतो गं मी
तुझ्या आठवणी टिपता टिपता, दिस माझा ढळुनी जाई
मी न राहिलो माझा, होऊ पाहत आहे तुझा
तुच सांग सोनु, काय करू मी आता?

अभिषेक ढमाले
टी.ई.सिव्हील



# खुप छान असतं हे बालपणं ...!

लहानपणी आईच्या कुशीत
खुप रडायचो
मग छोट्या छोट्या गोष्टी पाहून
नकळत खुप हसायचो

दिवसभर बाबांच्या खांद्यावर
खुप खेळायचो
बाबा दमलेले पाहुन रात्री मात्र
पाय त्यांचे नक्कीच चेपुन द्यायचो

झोपायच्या वेळेस मी
आजोबांजवळ बसुन गोष्टी एकायचो
गोष्टी एकता – एकता मात्र
तिथेच झोपुन जायचो

जसे जसे मोठे झालो
तसे सारे विसरत गेलो
म्हणुन मागणं मागतो देवाला
देशील का रे बालपणं
परत तु आम्हांला

आजही एकांतात बसलो की
आठवू लागतात ते दिवस
मग हे आठवण्यासाठी की कायं
खुप छान असतं हे बालपण...!

धनंजय बिरदवडे
टी.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा

# भावनांची गरज

शब्दांना भावनांची गरज पडते,
कारण शब्द कितीही निर्मळ असले
तरीही त्यांच्या एकटे येण्याने सारे विस्कळीत होते,
अर्थाचा अनर्थ होऊन नात्यांना भिंत उभारते,

शब्द कमकुवत नसतात आणि निराधारही
ते मुळातच ठाम आणि खंबीर असतात,
फक्त सत्याचे पुरावे द्यावे लागतात,

साक्षीदार आणि पुरावे जातात थकून
परिणामी त्यांचीच मानहानी होते,
साठीच शब्दांना,
उंची, सूर आणि भावना यांना सोबत घ्यावे लागते,
खरंच... शब्दांना भावनांची गरज पडते...

ज्योती महाळुंगकर
एस.ई.कॉम्प्युटर



# गुलमोहर

सदासर्वदा सदाहरित असावं,
असं काही नसतं ना...
थोडीशी पालवी अन्
थोडीशी पानगळ ही हवी ना....

कारण जे जातं, ते नव्यानं परत येतं,
पुन्हा त्याच जोमाने यंतं,
पानगळ होण्यात काहीच द:ख नसतं,
ते तुटलेलं पानसुद्धा वाऱ्यावर गिरक्या घेत,
लहरत लहरत अगदी आनंदाने मातीत मिसळतं,

गुलमोहराचे झाड मात्र वाट बघतं वसंताची,
नवीन पालवी फुटण्याची,
हे असं, झाडाबाबतीत असू शकतं,
तर आपल्यासाठी असंच होऊ शकतं ना....
सदासर्वदा सदाहरित असावं,
असं काही नसतं ना...

फक्त सवय करून घ्या, स्वत:ला गुलमोहर बनवण्याची
आणि मग करा मनाची तयारी, दोन्ही क्षणात जगण्याची

ज्योती महाळुंगकर
एस.ई.कॉम्प्युटर

# तुला कसं कळत नाही ...

तु नसतानाही भास होतोय मला
तुझ्या असण्याच्या !
हे तुला माहीत करतो ?
हे तुला कस कळत नाही !!

तुझ्या आठवणीत दिवस कसे जात आहेत,
हे मला कळत नाही !
आणि माझे ह्दय फक्त तूझ्यासाठीच
धडकतय हे तुला कस कळत नाही !!

वेड्या मनाला माझ्या तुझ्याशिवाय
काही सूचतच नाही !
तु – तु अन फक्त तूच तुझ्याशिवाय दुसर
काही दिसतच नाही !!
आणि मी प्रेम तुझ्यावर करतो तुला
कस कळत नाही !!!

गुलाबाचे महत्त्व हे काट्याना माहीत नाही
प्रेमातच जगाव हे जगाला कळत नाही
आणि मी माझ्या मनात तुला बघत
आहे हे तुला कस कळत नाही !!!

न बोलणारी ही प्रित माझी
तुला का कधिच कळत नाही !
अन वेडं हे मन माझ तुला
पाहिल्याशिवाय राहावत नाही
आणि मी प्रेम तूझ्यावर करतो हे
तुला कस कळत नाही !!!

ज्ञानेश्वर राठोड
बी.ई.सिव्हील



# आई

जगण्याच्या धडपडीत
घर सुटतं पण...
आठवणी कधी सुटत नाहीत....

आयुष्यातलं आई नावाच पान
काहीही झालं तरी कधीच मिटत नाही.

तळहाताचा पाळणा करून सांभाळते ती आपल्याला
आपल्या आयुष्यात आनंदाचा
नेहमीच खुलवते ती मला
आपण जरी विसरलो
तरी माया तिची कधी घटत नाही.

आयुषयातलं 'आई' नावाचं पान
काहीही झालं तरी कधीच मिटत नाही
तीच्या अखेरच्या श्वासापर्यंत
तीला आपलाच लळा असतो.

आपलं मन मोठ व्हावं
ह्यातच तीचा जगण्याचा सोहळा असतो
तीच्या पंखाखाली मन निवांत असते
चिंता कधी वाटत नाही

आयुष्यातलं 'आई ' नावाचं पान
काहीही झालं तरी कधीच मिटत नाही.
कधीच मिटत नाही.

अश्विनी पाटील
बी.ई.कॉम्प्युटर



# जगावचं लागतं...!

मनात खुप काही असतं सांगण्यासारखं
पण काही वेळा शांत बसणचं बरं असतं....

आपलं दु:ख मनात ठेवून
अश्रु लपविण्यातचं आपलं भलं असंत....

एकांतात रडलं तरी चालतं
लोकांमध्ये मात्र हसावचं लागंत...

जीवन हे असचं असतं ते
ते आपलं असलं तरी
इतरांसाठी ते जगावचं लागंत...

धनंजय बिरदवडे
टी.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा

# इंग्लिश VS मराठी




मातृ म्हणा मदर म्हणा
आई शब्दात जीव आहे...

पिता म्हणा पप्पा म्हणा
बाबा शब्दात जाणीव आहे...

सिस्टर म्हणा दीदी म्हणा
ताई शब्दात मान आहे...

ब्रो म्हणा भाई म्हणा
दादा शब्दात वचक आहे...

फ्रेंड म्हणा दोस्त म्हणा
मित्रा शब्दात शान आहे...

एन्ड म्हणा फिनिश म्हणा
अंत शब्दात खंत आहे...

दिवार म्हणा वॉल म्हणा
भिंत शब्द जिवंत आहे...

रिलेशन म्हणा रिश्ता म्हणा
नातं शब्दात गोडवा आहे...

एनेमी म्हणा दुश्मन म्हणा,
वैर शब्द जास्त कडवा आहे...

हाय म्हणा हॅलो म्हणा
हात जोडणे संस्कार आहे...

सर म्हणा मॅडम म्हणा
गुरू शब्दात अर्थ आहे...

ग्रॅंड पा ग्रॅंड मॉ शब्दात
काही मजा नाही

आजोबा आणि आजी सारखे
सुंदर नाते जगात नाही...

गोष्टी सर्व सारख्या
पण फरक फार अनमोल आहे...

अ ते ज्ञ शब्दात ज्ञानाचे भांडार आहे.
म्हणुन इंग्रजी पेक्षा आपल्या मराठीत आदर आहे.

अश्विनी पाटील
बी.ई.कॉम्प्युटर



# अजुनही मला आठवतंय...

Lecture ला दांडी मारून
बाजुचा परिसर फिरत बसायचो
फिरून कंटाळा आला की
परत College कडे वळायचो

Canteen वाल्याला खुप बोलायचो
न बाहेरच्या हॉटेलमध्ये जायचो
हॉटेल बंद झाल्यावर
Canteen मध्येच गिळायचो

Library Card चा तसा
कधी उपयोगच झाला नाही
Canteen समोरचं असल्याने
Library कडे पावलं कधीच वळली नाही.

Oral च्या वेळेस
रात्रभर पाठांतर करायचो
सकाळी College मध्ये गेल्यावर
मात्र सगळं विसरून जायचो

सोबत रडलेलो क्षण आठवले
की आजपण खुप हसायला येतं
पण तेव्हा सोबत हसलेलो
क्षण आठवले की डोळ्यात
लगेच चटकन् पाणी येत
खुप आठवतात ते दिवस

धनंजय बिरदवडे
टी.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा



# विद्यार्थी

अभ्यासाच ओझं वाहुन वाहुन तो थकला
तरीही त्याचा कोणीच कसा विचार नाही केला

म्हणता तो विद्यार्थी, त्याला नसावा अभ्यासाचा कंटाळा
पण अभ्यास करून करून त्याचा होतो डोमकावळा

अभ्यासाच्या ताणाने तो आता पिकला
विद्येच्या या बाजारी तो गेला विकला

सारखा सारखा अभ्यासाचा आला त्याला उत्माळा
तरीही पालक म्हणतात अभ्यास कर बाळा

शेवटी हा विद्यार्थी येतो अभ्यासाच्या दडपणाखाली
तरीही त्याला स्वत:मागे दिसते फक्त अभ्यासाची सावली

गुरुदास आवटे
बी.ई.मेकॅनिकल



# वाटसरू

झाली प्रखर सकाळ, गोड पक्ष्यांच्या बोलीत
पांढरेशुभ्र दाट धुके, सह्याद्रीच्या कुशीत ।।१।।

हा गारगार वारा, जाई अंगाला झोंबून
तव्हा पांघरू आभाळ, बसू सूर्यावर रूसुन ।।२।।

चढू सह्याद्रीच्या रांगा, चालू सिंहाच्या चालीत
हिंदू कडा-कपाऱ्यांमधूनी, बोलु पक्ष्यांच्या बोलीत ।।३।।

डोई सुर्याची किरणे, घेऊ हातावं भाकर
खाऊ खडकावं बसूनी, देऊ खुशीत ढेकर ।।४।।

झाले ढगाळ आकाश, सुरू परतीचा प्रवास
सारे पशू - पक्षी जाई, आपल्या घरास ।।५।।

आला वळीवाचा पाऊस, आम्ही सस्याच्या वेगानं
रानवाटा तुडवत, जाऊ डोंगर यंगून ।।६।।

असा हा वाटसरू, पशु - पक्षी त्याचे मित्र
निसर्गाच्या सानिध्यात, चाले हा सह्याद्री पुत्र ।।७।।

चेतन पडवळे
बी.ई.मेकॅनिकल



# माझी माय

तहानलेल्याची तहान तू
भुकेलेल्याची भुक तू
जन्मभरही संपणार नाही
अशा मायेचा सागर तू

कोकिळेचे गीत तू
सावित्रीची लेक तू
अहोरात्र कष्टाचे
एक मात्र ब्रीद तू

उन्हामध्ये सावली तू
देवाचीही माऊली तू
माझ्या सदैव आनंदाचे
सुंदर असे कारण तू

शरीरामधला प्राण तू
फुलामधला गंध तू
ऊंच उडणाऱ्या पक्षासाठी
मायेचे आकाश तू

गीतकाराचे गीत तू
चित्रकाराचे चित्र तू
लाखांमध्ये एक अशी
माझी गोड माय तू

गुरूदास आवटे
बी.ई.मेकॅनिकल

# उबग

उबग आलाय मला
या शहरी वातावरणाचा
कोणीच विचार करत नाही
माणसा माणसाचा

सगळीच येथे खुंटतात
जेव्हा
भावनांचे दरवाजे बंद होतात

शहरापेक्षा गाव नक्कीच छान असते
कारण तेथे माणुसकीचे जाळे विणलेले असते

विषाळलेल्या वातावरणाच्या शहरात
श्वासही घेणे होते जड
परंतु गावाकडल्या झुळुक वाऱ्यात
कशाचीच नसते नड

गजबजलेल्या शहरात
परके असतात सारे
गावाकडल्या एकटेपणात
सोबत असतात वारे

आल्हाददायक असते
गावाकडली माती
येथेच जोडली जातात
सुंदर सुदर नाती

शहरामध्ये या सगळ्यांचा
असतो खुप तोटा
म्हणुन मी काय सांगतोय
हे तु ध्यानात ठेव बेटा

गुरूदास आवटे
बी.ई.मेकॅनिकल

# ती आणि मी

ती लवकरच येणार आहे, हे कळलं,
नकळत माझ्या मनात प्रीतीचं फुल उमललं,
तिला भेटण्यासाठी सारं धैर्य एकवटलं
पण जशी तिच्या येण्याची तारिख जवळ येत होती,
तशी माझी छाती धस्स होत होती,
तिच्यासाठी एक एक दिवस मोजत होतो,
रात्रीचा दिवस आणि दिवसाची रात्र करत होतो,
तिला भेटण्यासाठी केली तयारी आणि भरपूर सराव,
आपले भाव तिच्या मनात उतरवायचे हा संमत केला ठराव,
आदल्या रात्री झोपही येत नव्हती
कारण मला ती उद्या भेटणार हाती,
जाणून काढली रात्र फक्त तिच्यासाठी
अखेर तो दिवस उजाडला,
मी ही तिच्याशी बोलण्याचा पाढा पाठ केला,
बोलायचं असतं तिच्याशी अगदी मनापासून,
पण तिला पाहिल्यानंतर विचारच काय तर शब्दही जाचे पळून,
म्हणून तर सगळी घोकपट्टी केली ठरवून,
काहीही झालं, अगदी काहीही
तरी थांबायचं नाही, घाबरायचं नाही असं ठरवलं
ती आली, मी तिला पाहिलं
तिला पडणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर देऊन टाकलं,
तरी एका विषयावर बोलायचं राहिलं,
राहिलं ते राहिलंच, पण तीने एकदाही मागे नाही पाहिलं,
ती गेली हातातून निसटून, मध्येच हाथ सोडून,
तिचं वेळेचं गणित पक्कं होतं,
माझं मात्र वेळेचं गणित जमत नव्हतं,
या कथेत आपलं पात्र विद्यार्थ्याचं
आणि तीचं मात्र परिक्षेचं असतं...

ज्योती महाळुंगकर
एस.ई.कॉम्प्युटर

# सांग ना दादा



जन्माच्या वाटेवरच मी मरते
सांग ना दादा मी अस काय करते
मलाही जगायचंय आयुष्य तुझ्यासारखे
पण काय करू मी जन्माआधीच मरते

मलाही इच्छा आहे दादा तुझ्यासारखे शिकायची
मलाही वही–पुस्तकांची सोबत ही करायची
मलाही इच्छा आहे पेन हातात धरायची
मुलगी वाचवा मुलगी शिकवा ही अक्षरे कोरायची
स्वप्ने माझी असती मोठी तरीही मी आधीच हारते
कारण दादा मी जम्नाआधीच मरते

जन्माच्या वाटेवरच मी मरते
सांग ना दादा मी अस काय करते
मलाही जगायंच आयुष्य तुझ्यासारखे
पण काय करू मी जन्माआधीच मरते

कळले का मला दादा, मुलगी आहे म्हणून काय
माझी चूक
का विषमता करतो माझा देश नि माझाच मुलुख
जरी जन्माला आलेच तरी नाही मिटत माझी
शिक्षणाची भुक
मग तुच सांग दादा, या जन्मात कसलं आलय सुख
शिक्षण होईल का पूर्ण हा विचार करूनच मी झुरते
कितीही झाले खंबीर तरी मी मनानेच हारते

जन्माच्या वाटेवरच मी मरते
सांग ना दादा मी अस काय करते
मलाही जगायंच आयुष्य तुझ्यासारखे
पण काय करू मी जन्माआधीच मरते

अविनाश आहेरकर
टी.ई.मेकॅनिकल

# बरं केलं भल्लालदेवा

बरं केलं भल्लालदेवा
मारलस तुझ्या भावाला
जास्त चांगलं असनही नाही चांगलं
पुन्हा एकदा दाखवलं जक्षाला

त्याच्याच आईच्या हाताने
तु जीव त्याचा घेतला
विजय अन्याय सहन करणाऱ्याचाच होतो
संदेश जगाच्या तोंडावर फेकला

संपवल नसतं तर तु त्याला
तर तो परत राजा झाला असता
पुन्हा तेच ते रामराज्य
अन तोच तो प्रसंग अग्निपरिक्षेचा
आला असता

वाईट लाख म्हणू दे जगाला
पण तु स्वत:ला वाईट समजु नको
माझ्यासारखे अनेक सहनकर्ते आहेत
सोबतीला तुझ्या
हे कधी विसरू नको.

प्रशांत मांडे
टी.ई.मेकॅनिकल

# तो एक बाप असतो...



शाळेपासून बापाच्या हाकात तो राहत असतो,
कमी मार्क पडलेले प्रगती पुस्तक लपवत असतो,
आईसाठी लपून तो बापाशी बोलत असतो,
डोळा चुकवून बापाचा, हुंदाडायला जात असतो,

शाळा संपते, पाटी फुटते, नव जग समोर येत,
कॉलेज नावाच्या भुलभुलैयात मन हरवून जात असतं,
हाती असलेल मार्क घेऊन पायऱ्या झिजवत फिरतो,
बाप पाहतो स्वप्न नवी, हे मुखडा शोधत असतं,

परिक्षा संपते, अभ्यास सरतो, डिग्री पडते हाती याच्या,
नोकरी मिळवत, नोकरी टिकतव कमाऊ लागतो चार दिडक्या,
आरामात पसरणारे बाजीराव घोड्यावर स्वार होतात,
नोकरीच्या बाजारात नेमात मोहिमा काढू लागतात,

कडकपणाच्या आवरणाखाली झुळझुळणारं पाणी असतं,
भल्यासाठी लोकसंख्या झगडणारं हाड असतं,
दोन घास कमी खाईल पण पोरांना गोड देतो,
हट्टासाठी पोरांच्या ओव्हर टाइम तो मारत असतो,

डोक्यावरती उन्हे झेलत, सावली तो देत असतो,
दणाणत्या पावसा पासून कुटुब आपलं जपत असतो,
घर नीट चालण्यासाठी स्वत: बाहेर फिरत असतो,
आईच्या मऊशीर तळव्यामागचा तोच राकट हा असतो,

बाप कधी रडत नाही नि बाप कधी खचत नाही,
बाप कधी उतत नाही, नि बाप कधी मातत नाही,
पोर मोडतात घरटं अन् शोधू लागतात क्षितिज नव,
बाप मात्र धरून बसतो घरट्याची प्रत्येत काडी

पोराच्या यशासोबत त्याच मन हसत असत,
अपयश पचवताना तो आतुन रडत असतो,
काही झालं कितीही झालं तरी कणा ताठ असतो,
खचलेल्या पोराला तोच उभारी देत असतो,

सारी कथा समझायला फार मोठ व्हावं लागतं,
बापाचं मन कठीण फार, चटकन हाती लागत नसतं,
आकाशाहून भव्य अन् सागराची खोली असते,
बाप या शब्दाची महतीच मोठी न्यारी असते.

नागेश वाडेकर
एस.ई.मेकॅनिकल



# तुझी साथ असताना

## माझी ही कविता फक्त तिच्यासाठी ...!



तुझी साथ असताना
तुझी साथ असताना
मन अस फक्त तुझ्यावरच स्थिरावत,
ना भान असते स्वत:चे ना जगाचे
तुझी साथ असताना .....

तुझी साथ असताना
वेदनाही होतात कमी
सुखाची मात्र असते हमी
तुला पाहत बसतो मी पुटपुटत
तुझ कोडं मात्र कधीच नाय सुटत
तुझी साथ असताना .....

तुझी साथ असताना
जीवनाची किम्मत कळते
मन नेहमी फक्त तुझ्याकडेच वळते
तुझ्या प्रत्येक गोष्टीला देत असतो दाद
याच आशेत की मिळेल तुझी
जन्मभर साथ
तुझी साथ असताना .....

तुझी साथ असताना
मनाला अस प्रसन्न वाटत
मग आपल्या प्रेमाच कोडं अस
हळुवार सुटत
जाणीव होते प्रेम म्हणजे काय असत?
फक्त तुझी साथ असताना .....

तुझी साथ असताना
वाटत फक्त तुझ्याबद्दलच लिहत रहाव,
अन आपल प्रेम असच अबाधित रहावं
मला तुझ्यासोबत आयुष्य सजवायच आहे,
तुझ्या सोबत सुख द:ख पाटुन घ्यायचे आहे
पण हे सगळ होऊ शकत
फक्त तुझी साथ असताना .....

तुझी साथ असताना
अशक्य ते शक्य करून दाखवेल मी
तुझ्यावर नेहमी असच अपाड प्रेम
करत राहील मी
''जाणार नाय ना ग रानु सोडुन तु मला
खरं आहे आपल प्रेम दाखवुन देऊ या जगाला ''
तुझी साथ असताना
तुझी साथ असताना

सागर पाचोडे
एस.ई.मेकॅनिकल

# भाऊ खरच खुप आठवण येते रे तुझी



या जगातील माझी सर्वात
प्रिय व्यक्ती आहेस तु,
भाऊ नाय माझं सर्वस्व आहेस तु
कस सांगु तुला किती प्रेम आहे रे माझं,
माझं जे आहे ते सर्वच आहे तुझं
कस सांगु तुला काय अवस्था होते माझी
भाऊ खरच खुप आठवण येते ना रे तुझी ....

आलोय तुझ्यापासुन दुर,
पण नाय रे गवसत आहे जगण्याचा सुर
येतो तुझा फोन जेव्हा वाटत मनाला बरं
वाटत आज सांगुनच टाकावं तुला
मनातल सगळ खरं
पण नाय रे होत हिम्मत माझी
पण भाऊ खरच खुप आठवण येते ना रे तुझी....

तुझ्यासोबत जगलेला प्रत्येक क्षण
नाय विसरू शकत मी,
भाऊ Promise आयुष्यभर तुझ्याच
सोबत राहील मी
Please मला पण समजुन घेत जाना भाऊ
माझं रागावण नको ना एवढं मनावर घेत जाऊ
मला सतत लागली असते रे काळजी तुझी
भाऊ खरच खुप आठवण येते ना रे तुझी....

मी जगातील सर्वात Lucky व्यक्ती आहे,
कारण माझ्याकडे तुझ्या सारखा भाऊ आहे
तुझा मनमोहक चेहरा माझ्या दिवसाची
सुरवात आहे,
तुझ्या प्रत्येक गोष्टीत तुला माझी
साथ आहे,
भाऊ नाय ना रे सोडणार तु कधी साथ माझी?
भाऊ भुषण खरचं खुप आठवण येते ना रे तुझी
खरच खुप आठवण येते ना रे तुझी
खुप आठवण येते ना रे तुझी

सागर पाचोडे
एस.ई.मेकॅनिकल

# भावना

एकदा माझ्या 'भावना'
माझ्यावर नाराज झाल्या

म्हणाल्या का कोंडून ठेवलय आम्हाला?
का नाही आणत जगासमोर आम्हाला?

आम्हाला मनातच ठेवून
आनंदाचा मुखवटा का घालून फिरतो?

त्यांच्या प्रश्नांची उत्तरं नव्हती माझ्याकडे
शरमेने पाहूही शकत नव्हतो त्याच्याकडे

तेवढ्यात कोपऱ्यात कोणीतरी दिसले,
त्याला पाहून थोडे बरे वाटले,
शब्द होते ते, एकटेच बसलेले

भावनांना वाट करण्यासाठी
त्यांची शब्दाबरोबर सांगड घातली
आणि तिथेच माझी
कविता तयार झाली

कुणाल पाटील
बी.ई.मेकॅनिकल



# असे जगावे

आपल्या कल्पनांचे आपण लाड करावे
भावनांसाठी दार ह्दयाचे उघडे सताड करवे
स्वप्नांवर आपल्या माया ममता करावी
जगण्याच्या कोऱ्या कागदाची सुंदरशी कविता करावी

बंधने जगण्यातील मनपाखरे मुक्त करावी
मनात येणारी ओळनओळ व्यक्त करावी
रोजच आयुष्यात नवनवीन करामत करावी
जगता जगता अचानक दिवसाची कयामत करावी

काम एखादे न भुतो न भविष्यती करावे
उगाच एखादी गोष्टीस अतिशयोक्ती करावे
प्रेमाने आपल्या जगास ह्या बंधीस्त करावे
नुसते जाळु नये तर आपणासही लोकांनी
समाधिस्त करावे

कयामत : आयुष्याचा शेवटचा दिवस

प्रशांत मांडे
टी.ई.मेकॅनिकल



# सांग ना ग आई
# तिचा काय गुन्हा ?

आई ऐकतेयस ना?
तुझाच अंश आहे ना ग ती?
मग तिला जगात यायला का ग अडवतेयस तु?
मुलीला जन्म देन खरचं आहे
का ग या समाजात गुन्हा
मग आई सांग ना ग त्यात तिचा काय गुन्हा?

'' सबसे बडा रोग क्या कहेंगे लोग? ''
मग यासाठी तीच्याच नशीबी का
ग सारे भोग?
आई मला पण हवी ना ग एक मैत्रीण, एक
सोबती, एक बहिण,
जी सुख दु:खात नेहमी माझ्या
सोबतीला राहीण,
आई नको ग करू अस पुन्हा
सांग ना ग त्यात तीचा काय गुन्हा?

मला कळत नाय एवढा त्रास सोसला
तरी तुझ्या मनात विचार कसा ग आला?
आजी - बाबांकडे नको न लक्ष देऊ, त्यांचा
जन्म मुलगा-मुलगा करण्यातच गेला
आई तु नको ग काळजी करू
तिच्या भविष्याची
ती स्वता तयार करेल वाट
तिच्या नशिबाची
अशी वेळ नाय ग येनार पुन्हा पन्हा?
सांग ना ग त्यात तिचा काय गुन्हा?

आई असेल गं मी तुमच्यासाठी
वंशाचा दिवा,
पण याला कोणी विझवु नये
यासाठी तिचाच आडवा हात हवा
आई किती वेळेस मारशील स्वत:ला पुन्हा
सांग ना ग त्यात तिचा काय गुन्हा?

आई तु तर पोटच्या पोरांसाठी
काही पण करू शकतेस,
मग या पापी समाजाशी
तर नक्कीच लढू शकतेस
आई हेच मागण आहे माझ
तुझ्याकडे पुन्हा
नको ग घेऊस कोणाला घाबरून
चिमुकलीचा जीव पुन्हा

आई तरी तुला काही वाटत असेल
तर मला फक्त एवढच सांग,
मुलगी म्हणुन जन्माला येतेय त्यात
तिचा काय गुन्हा?
तिचा काय ग गुन्हा?

सागर पाचोडे
एस.ई.मेकॅनिकल



## माझ्या कवितेसाठी

ही एक कविता तिच्यासाठी
जीने प्रत्येकवेळी मला आधार दिला,
ही एक कविता कवितेसाठी

माझ्या अश्रुंना जीने शब्द बनवले,
माझ्या भावनांना जीने अर्थ दिला
ही कविता तिच्यासाठी
ही कविता माझ्या कवितेसाठी

जेव्हा माणसांच्या गर्दीत मी
एकटा पडलो तेव्हा जीने मला
सोबत दिली तिच्यासाठी
ही कविता माझ्या कवितेसाठी

सर्वांत महत्त्वाचे
ही कविता माझी तिच्यासाठी
जीने मला कवी बनविले
ही कविता माझ्या कवितेसाठी

कुणाल पाटील
बी.ई.मेकॅनिकल

## शून्य

फरक नसतो पडतं आयुष्यात कोणाच्या ही जाण्याने....
फक्त आठवण मनात सलते आणि डोळे भिजती पाण्याने....
डोळातले आसव पुसून विरतील पण आठवणीचं काय?
मन मारून तर आयुष्य सरल पण होणाऱ्या भासाचं काय?
गणिता सारखं आयुष्यात होत राहते नात्यांची वजाबाकी....
कितीही करा प्रयत्नांचा गुणाकार नशिबापुढे शुन्यच बाकी.

अनिकेत याचकल
बी.ई.मेकॅनिकल

# आयुष्य

पाहिला गेलं तर तीन अक्षरांच...
उलगडायला गेलं तर तीन टप्याच...
कवटाळायला गेल्यावर कवेत न मावणार...
आणि जगायला गेलं तर भुरकण उडणार...

आयुष्य म्हणजे न संपणारा प्रवास...
आयुष्य म्हणजे सांज मोगऱ्याचा सुहास...
आयुष्य म्हणजे लवलवणारी पापणी...
तर कधी नुसतीच सराव चाचणी...

आयुष्य म्हणजे न संपणारी आशा...
तर कधी नुसतीच निराशा...
आयुष्य कधी शिंपल्यातला मोती...
तर कधी जणू दारातला मोती...
आयुष्य कधी तुळस ओट्यावरची...
तर कधी निवडूंग बांधावरची...

खरं म्हणजे आयुष्य एका चौकटीत बसतंच नाही...
नेमकं कसं जगावं काही कळतचं नाही...
कोणाला संपण्याची घाई तर कोणाला शंभरीत ही जगण्याची ओढ...
खरं सांगायचं झालं तर आयुष्य म्हणजे फक्त आंबट गोड संत्र्यांची फोड...

अनिकेत याचकल
बी.ई.मेकॅनिकल.



# अपघात

आज रस्त्यावर एक अपघात झाला,
अपघातापेक्षा माणूसकीचा
खेळ मोठा झाला.

रक्त सांडले होते रस्त्यावर
पण मन कोणाचे सलत नव्हते
माणसं होती तिथे,
पण सगळे फोटो काढण्यात मग्न होते.

जखमी लोक अपेक्षेने उभ्या
लोकांकडे पाहू लागले,
पण निराश झाले ते कारण
माणसां ऐवजी बिना काळजाचे
दगडं त्यांना दिसू लागले

थोड्या वेळात गर्दी पांगली,
लोकं सगळं विसरून गेले,
शरीरासोबत मन ही सगळ्यांचे
घटनेपासून दूर गेले

कुणाल पाटील
बी.ई.मेकॅनिकल

# तिच्या न जन्मलेल्या आईस...

मुलीच आई बरोबर संभाषण कसं होतय....?
जन्माच्या आधी आज बाळ आईच्या स्वप्नात येतय
कळलं का आई, तुला माझं लिंग?
मि ती आहे का, तो आहे?
हे ठरवलं आता माझं जगणं !
जन्माच्या चार महिने आधी माझा मृत्यु होईल का?
तु माझा चेहरा पाहण्या आधीच मला संपवशील का गं?
बरोबर आहे तुझं आई,
जगात येऊन काय करू?
जिच्यासाठी यायचं, तिला दोष देऊन काय करू?
झाला जन्म जरी चुकून, तरी किती मोठे पाप बघ,
आधी भाऊ असेल तर, सगळे दोष माफ बघ....

आता थोड कमी झालय माझ्या बहिणींच मरणं,
जन्माचा धोका टळून पण अवघड आहे जगणं....
खुप खुप विचार करून आयुष्य पुढे सरकतय...
दिली जर तु साथ तर, आहे सोबत कोणीतरी अस वाटतयं....

भिती आता बाहेरच्या जगाची पण आहे
कोण जाणे भूक कोणा लागेल माझ्या देहाची
मग खरा संघर्ष होईल आयुष्याशी.....

तसे, नको असेल तर मी,
आयुष्य संपवलेलच बरं....
नंतर असं मन मारून जगण्यापेक्षा,
न जन्मलेलच बरं....!

बस झाल आता नवीन सकाळ होईल बघ,
तुझा सुर्य उगवल पण, माझा मावळला जाईल बघ....

सुंदर जस नशीब माझ विधात्याने लिहलंय
जगाचा कुठलाच त्रास न होता,
आयुष्य तुझ्या ताब्यात दिलय....

एक शेवटचा शब्द माझा स्वप्न समजून ऐक गं,
माझ आयुष्य संपल्यावर
तुझ्याही स्त्रित्वाला अर्थ नाही गं....

विजय भोसले
एम.बी.ए.

# आठवणीतलं PK कॉलेज

– आठवणीत राहतील या आठवणी PK मधल्या,
चक्क रडवतीलच प्रत्येक वळणावर आयुष्यातल्या.
– कॉलेजच्या कट्यावरच्या त्या गप्पा रंगलेल्या Affairs व
Breakup च्या,
पार्ट्या त्या Canteen मधल्या वडापाव व Thumbs-up च्या.
– आठवणीत राहतील ते पाटील सरांचे उशिरापर्यंतचे lectures,
आणि त्यांनी हाकलून लावलेले आपण सर्व back benchers.
– आठवणीत राहतील Phule मॅडम तुमच्या Project work
च्या Deadlines,
त्यामुळे भविष्यात वाचेल आमचा खुप मोठा Fine.
- आठवणीत राहतील ते जाधव सर कधी–कधी वाटतं सर
हातातलं घड्याळ विकावं,
अन वेळेचं Management तुमच्या कडून शिकावं.
(विचारांचे चालते बोलते विद्यापीठ)
– आणि आपले सर्वांचे लाडके, Limited Ed. Manjumath sir
सर्वांनाच हवे असतात as a Sub. Teacher हमखास,
आणि हळूच हसवतात Shyam Kumar सरांची शायरी कम
राजकीय विश्लेषण झकास (विकास पगला गया है)
- Departments च्या प्रत्येकाचेच आहोत आम्ही नेहमी ऋणी,
त्यामुळेच आज आहोत आम्ही योग्य ठिकाणी.
– जरी विसरलो या जगाला तरीही तुमच हे प्रेम
नेहमी आठवणीत राहील. (Our Teachers)
– मित्रांनो चुकलो असल कुठल्या गोष्टी मध्ये in Case,
तर माफ करा मला जरी मी असलो Short Term
Memory Less.

भाऊसाहेब देवढे
बी.ई.मेकॅनिकल

# सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकलेली युवापिढी

असं म्हणतात की Google वर काहीही Search केले कि लगेच सापडतं, म्हणून मीही इकडे तिकडे कोणाला काही न विचारता Google वरच Searching ला टाकलेत काही प्रश्न. ते म्हणजेच Delete झालेलं बालपन पुन्हा Recycle होईल का? खुप खुप वाटायचच सर्वांना Whatsapp वर Forward केलं तर चालेल का? भावनांचे Shares घसरत चालेत, ते कसे वाढवायचे? दु:ख Friend Request न Friend टाकता List मध्ये Add होतय, त्यावर काही Solution मिळेल का? असे आणि बरेच काही.. पण उत्तरं मात्र मिळालीच नाहीयेत अजून. ह्याच्या ठोक्यांपेक्षाही जास्त Speed आहे Internet ची, पण तरीही उत्तर मात्र मिळालीच नाहीत. Network खुप Busy आहे वाटतं. Still Processing असो... Process होईपर्यंत चला आपणच थोडी चर्चा करू.

बदलत्या युगात आपणपण बदलायचं,<br>
अपडेटेड जगात अपडेट होत राहायचं.

हा जणू सध्याच्या युवापिढीच्या जगण्याचा मूलमंत्रच बनलाय. Social status हाच Tag जपण्यात सध्याच्या युवापिढीचा मोर्चा निघालाय. या सगळ्या गोंधळात मात्र सध्याची युवापिढी माणसामाणसाला ओळखायला विसनीय. भरकटलीय कुठेतरी Committements, Likes, Tag याच्या गुरफटलेल्या जाळ्यात. विसरताहेत ते लहानपणीच्या लंगडी, लपाढपी मध्ये अडकलेले आपण आणि जन्मास घालताहेत स्वत:तले मीपण...

केव्हातरी असेच मित्रमैत्रिणी भेटलो, बसलो कि जाणवतयं ते अंतर, जे लहानपणी खेळताना काही पावलांचे पण नसायचे. आता सोबत तर असतो, किंबहुना पूर्वीपेक्षा जास्त सोबत असतो. पण त्याचबरोबर एक नवीन मित्रपण सर्वांसोबत हसत, खेळत न चुकता Attendance लावत असतो, तुम्हां सर्वांचा लाडका Mobile. त्याने खूप चांगल्या प्रकारे आपल्यातल्या त्या एका प्रेमाच्या धाग्याला ते बोलतात ना एक Replacement शोधून काढलीय. मी कोणा दुसऱ्याचे मत ऐकून नाही बोलत आहे बरं का? मी पण त्यातलाच एक भाग आहे. स्वानुभवाचे बोल आहेत हे, जे तुमच्याशीच Interact होऊ पाहताहेत.

बालपणी एक उत्सुकता होती नवीन गोष्टी जाणून घ्यायची, समजून घ्यायची. आता असे बरेच Sources आलेत की ज्याने आपण आपली उत्सुकता तरी मिटवू शकतो, समजू शकतो एखादी गोष्ट सहज सोप्या रीतीने. पण ती उत्सुकताच आता आकर्षणामध्ये रूपांतरीत झालीय. लोकं उत्सुकता म्हणून नाही तर आता सवय, आकर्षण म्हणून या Social Media कडे पाहायला लागलेत. अरे Photo Selfie काढलाच पाहिजे, नाहीतर लोकांना कां कळणार कि या क्षणी आपण काय करतोय? View कसे येणार? सगळ्यांना Pic आवडेल की नाही? कि नकोच Upload करू? या प्रश्नांची उत्तरे मिळाली तरच सध्याची मुलं तो क्षण अनुभवतील आणि मनात Capture करतील ना? नाहीतर त्याचे उत्तर पण आत्ता Google वर शोधावे लागेल.

Teenage म्हटलं तर, या वया खरंतर मुलांना maturity आली पाहिजे. पण social networking sites वर त्याचें आठवड्याला होणारे वाद, break ups यामुळे तर ते येणाऱ्या पीढीला आपल्या चांगल्या वाईट अनुभवांचे धडे लागलेत, जे एकेकाळी जरासं खरचटलं की आपण आजी आजोबांना, आई बाबांना रडत विचारायला जायचो कि मला लागलयं, मी काय करू आता? सांगा ना बाबा असं सांगत आपुलकीच्या, प्रेमाच्या अपेक्षेने भरलेल्या डोळ्यांनी एकटक पाहत राहायचो. कोणी लक्ष देतय की नाही आपल्याकडे, याचा विचार करायचो. तेच attention आता आपण whatsapp, facebook, twitter, instagram या social mediaवर शोधायला जातोय. परिस्थिती सारखीच आहे, तेव्हा आणि आतापण, मात्र बदललीय ती आपल्या मनाची पातळी अन् विचार करण्याची पध्दत.

पहाटे पहाटे चिमणी कोकीळांचे आवाज ऐकून उठणारे आपण आता mobile च्या ringtone ने जागे होतो.

आई बाबा जरा जरी ओरडले तर दचकून लगेच रडायला लागायचो. पण आता मात्र एखाद्या massage वर reply नाही आला, तर तो येईपर्यंत आपलया मनात घालमेल चालू असते. दोन दिवस net नाही वापरलं तर चुकल्यासारखे वाटतं आता लोकं feeling sad  अशी story, status पण post करतात. सोशल मीडीयावर आनंदाचे क्षण करणं आता रोजचच झालय. पण त्यापेक्षाही पुढचं म्हणजे, ते म्हणतात ना एक level up अशी स्थिती निर्माण झालीय. लोक एखादी दु:खद घटना घडली तरीही ती post करायला लागलेत, तीही कोणा इतरांची नव्हे तर स्वत:च्याच वाईट परिस्थितीचा तमाशा मांडलाय या लोकांनी. काही लोकं तर या सोशल मीडीया मध्ये इतके गुंतलेत कि depression मध्ये गेली एखादी व्यक्ती, अशा बातम्या पण कानावर पडताहेत. सुख आणि दु:ख या दोन्ही गोष्टी हा एक attention शब्दच handle करायला लागलाय. स्वत:लाच फसवण्याचा एक मार्ग शोधलाय लोकांनी. लोकं हे समजण्याच्या पण पलीकडे गेलीत कि या सोशल मीडियाचा शोध आपण सर्वांशी जोडले जावो, विचारांची देवाणघेवाण व्हावी, मनं जोडली जावीत, यासाठी लागला होता. पण आपण मात्र त्यालाच उछता बसताननाचा, जेवतानाचा किंवा रस्ता ओलांडन्याचा एक timepass केलाय. त्यामुळे माणसं प्रत्यक्षात खूप वेळ सोबत तर असतात पण ती वावरत मात्र भलत्याच जगात असतात. त्यांनी या खऱ्या जिवनापलीकउे एक काल्पनिक विश्व निर्माण केलयं कि ज्याचा खऱ्या जीवनाशी ताळमेळ घालणं कठीण होऊन बसलयं. ज्या हेतूने या मिडियाचा शोध लावला गेला, तो म्हणजे माणसं जवळ यावीत, पण माझ्या मते त्यामुळे अजुनच एकमेकांपासून दूर गेलीत. रोजरोजच्याच त्या बोलण्याने नाही त्या खूप दिवसांच्या भेटीच्या आतुरतेला काही अर्थच नाही उरलाय. प्राणी पण स्वत:चं अस्तित्व विसरत नाहीत कधी, पण माणूस मात्र भरकटलाच... हरवून गेलाय त्या सोशल मिडियाच्या वाढत्या जाळ्यात.

आता गरज आहे ती माणुसकी आणि तंत्रज्ञानाची सांगड घालयची. हो मान्य आहे तंत्रज्ञान चंद्रावर जाऊन पोहोचलय, आपल्यालाही पोहोचायचयं. पण याचा अर्थ असा नाही की लहानपणीच्या चांदोमामाला विसरायचं. काळ बदलतोय, आपणही बदलायचचं आहे, पण गोड काय कडू काय हे समजून वावरता आलं पाहिजे. आजही कधी काही खरचटलं तरी एवढं effictive औषध आलंच नाही, जे आईच्या फुंकर घालण्यामध्ये होते. तंत्रज्ञानाची सोबत घेऊन यशाची शिखर गाठणं आवश्यकच आहे, पण त्याचे कारण देऊन भावणाशून्य होत जाणं, हे कितपत बरोबर आहे, हे तुम्ही समजलं पाहिजे. म्हणूनच सोशल मीडियाला दोश न देता त्याचा योग्य वापर करणं शिकुया. त्याच्या जाळ्यात न अडकता, नात्याचं प्रेमाचं जाळं पुन्हा विणायला शिकुया. तरचं सापडतील उत्तरं आपल्या प्रश्नांची. मी ही शोधतेय आणि तुम्हीही शोधा Google तर काय In processing सांगतयं.......!

करिश्मा कदम
बी.ई.सिव्हिल



# स्त्री आणि शिक्षण

स्त्री शिकली असती तर जगाच्या इतिहासकारांमध्ये महिलांच देखील नाव असतं, योगदान असतं. महिला इतिहासकार, महिला वैज्ञानिक भुतकाळात सापडत नाही. स्त्री आणि शिक्षण या दोहोतला संबंध समजुन घेतला पाहिजे

तिला मिळणाऱ्या शिक्षणाने तिच्यावर होणारे अन्याय कमी झाले का? समाज ज्या पुरुषी दृष्टीकोणातून स्त्रीकडे पाहत होता तो पुरुषी दृष्टीकोण बदलला आहे का? तिला सर्वतोपरी स्वातंत्र्य मिळाले आहे का? ती सक्षम होऊ लागली आहे का? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळवुन स्त्री शिक्षणाचं मुल्यामापन करणं गरजेच आहे.

लिहिता वाचता येणे म्हणजेच शिक्षण नव्हे. खरं आणि खोटं यांतिल फरक ओळखण्याची दृष्टी देणारं शिक्षण म्हणजे शिक्षण आपल्यावर येणाऱ्या अन्याया विरुध्द लढा देण्यासाठी बळ देणारं शिक्षण म्हणजे शिक्षण गुलामाला गुलाम गिरीची जाणिव करून देणारं शिक्षण म्हणजे शिक्षण तर्कबुध्दीने विचार करण्याची दृष्टी देणारे शिक्षण म्हणजे शिक्षण या सर्व कसोटीवर आपलं शिक्षण कुठं खरे पणाणे कामी येतं हा मोठा प्रश्नच आहे?

भारता मध्ये स्त्री मृक्ती चळवळ, स्त्री शिक्षण चळवळ, देवदासी मुक्ती चळवळ, अशा असंख्य चळवळी भारतात चालू आहे. प्रश्न असा कि अशा चळवळीची गरज का भासली? या सर्व चळवळी आणि स्त्री शिक्षण यांचा इतिहासाशी घनिष्ठ संबंध आहे. म्हणुनच या सर्व वरील प्रश्नांची उत्तरे इतिहासातुन शोधल्या शिवाय स्त्री शिक्षण कसं होतं आणि कसं असावं याचा अंदाज येईल. म्हणूनच आपण डोकावुन पाहुया इतिहासात आणि प्रवास करू वर्तमाना पर्यंत.

हजारो वर्षाच्या पुरुषी गुलाम गिरीत जगणाऱ्या स्त्रीयांना त्यांचे हक्क, अधिकार मिळवून देण्याचे विश्वश्रेष्ठ कार्य महात्मा जोतिराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्री बाई फुले यांनी केले.

स्त्रीया फुलेंच्या शांळामध्ये शिकू लागल्या त्या विचार करू लागल्या. त्यातंच एक साक्षीदार उदाहरण म्हणजे फुलेंच्या शाळेत शिकणारी मुक्ता साळवे (१५ फेब्रुवारी १८५५) मुक्ता साळवे ही विद्यार्थीनी राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांच्या शाळेत तीसऱ्या वर्गात शिकत होती. तीचे वय ११ वर्षाचे होते. तीन्ही ''आम्हाला धर्म आहे काय?'' हा निबंध लिहीला. निबंधाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. मेजर फॅंडी साहेबांनी तिचा सत्कार केला व तिला बक्षिस देऊ केले. त्यावर मुक्ताने इंग्रजीतून सांगितले Sir u don't Give us Chocolate, Give us Library.

ज्या शाळेत जोतिराव आणि सावित्रीबाई शिकवीत होते त्याशाळेतील मुले किती विद्वान होती व ते आपले विचार किती प्रभावीपणे व तर्कशुध्द मांडत होते, ह्यावरून दिसते. जर आज हाच राष्ट्रपिता जोतिराव फुलेंचा अभ्यासक्रम ज्याने मुक्ता तयार झाली तो इयत्ता १ली पासुन शिकविला तरकाय होईल याचा सर्वांनी विचार करावा.

आता पाहुयात २१ व्या शतकातील स्त्री आणि त्यांचे सामाजिक स्थान. २१ व्या शतकातील महिला हळूहळू सर्व रुढी परंपरात गुलामी व्यवस्थेतून मुक्त होऊ पहात आहे. ति शिकू लागली आहे, विचार करू लागली आहे, आर्थिक बाबींमध्ये ही सक्षम होऊ लागली आहे. तरी देखील ह्या सर्व महिला क्रातींचा आलेख हा पुर्ण पणे सक्षम नाही.

संविधानाने तिला पुरुष समानता दर्जा दिलेला आहे. स्त्री पुरूष समानता संविधानाने दिली आहे. ती जरी शिकून सक्षम झाली असेल तरी आजही तिला स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ दिले जात नाही. वडील किंवा पती आजही तिला स्वत:चे निर्णय घेऊ देत नाही. म्हणजेच समाजाने तिच्या कडे पुरुष दृष्टी कोनातून पहाने आजही सोडलेले नाही. आजही पुरुष रडला की त्याला लोकं म्हणतात '' काय मुलींसारखा रडतो ''. स्त्री हि आजही समाजाने दुबळे पणाचे प्रतिक असल्याचे चित्रच स्वीकारले नाही.

स्त्री शिक्षणामध्ये मोलाचे कार्य करणाऱ्या फुले दांम्पत्य उदाहरण हे समस्त जगासाठी प्रेरणादायी आहे. माँ जिजाऊ साहेब, सावित्रीबाई फुले, स्त्रीयांची प्रेरणा स्थान आहे. स्त्री शिक्षणामुळेच कल्पना चावला Nasa Space Program मध्ये सहभागी होऊ शकल्या. भारताच्या महिला राष्ट्रपती प्रतिभा ताई पाटिल ह्या देखील आज महिलांसाठी प्रेरणास्थान आहे. समाजाने स्त्री यांना स्त्री शिक्षेतून स्त्री शिक्षणाकडे वळवले पाहिजे. स्त्री शिक्षणासोबतच स्वातत्र्य, समता, बंधूतेने समाजात वागवले पाहिजे. रूढी परंपरागत दृष्टीकोन सोडून स्त्री शिक्षण हे विज्ञान वादी व्हायला हवं.

**स्त्री शिक्षणाच्या जनक सावित्रीबाई फुले यांच्या चरणी विनम्र अभिवादन**

ज्योत पेटवलीस तु माझ्या ह्दया,
ति अविस्मरणीय राहील माझ्या जिवनात ।।
झुगारल्या तू रूढी परंपरा,
पुजली तु माणुसकी ।।
बाग तु फुलवलीस सत्याशोधक ज्ञानाची
आणि स्त्री शिक्षणाच्या चळवळीची ।।

मयुर नाणेकर
बी.ई.कॉम्प्युटर

# भारताच्या विकासातील तरुणांची भुमिका

भारत हा तरूणांचा देश आहे, याच वाक्याने भारताची आणि तरूणाची ओळख करून दिली जाते. कारण आज एकूण भारतीय लोकसंख्यच्या ६५% लोकसंख्या हि तरूणांची लोकसंख्या आहे. त्यात १३ ते ४० वर्षे वयोगटातील तरूण येतात आणि ही लोकसंख्या तब्बल ८० कोटी आहे. आकडे पाहुन लक्षात येते की भारत का शक्तिशाली होऊ शकतो ?

भारत हा तरुणांचा देश आहे हे सर्व जग ओळखून आहे. आणि हेच तरूण देश घडवू शकतात आणि बिघडवू शकतात. देश घडवायचा असेल तर आपली शक्ती ओळखून त्या शक्तीला एका दिशेन मार्गस्थ करणे अनिवार्य आहे.

महान अमेरिकन विचारवंत जेम्स, तरूणाची व्याख्या करताना म्हणतात ‘ तरूण म्हणजे आनंद लहान पक्षी जो नुकताच अंड्यातून बाहेर पडला आहे. आणि उत्सुकतेने स्वातंत्र्य आणि आशेच्या खुल्या आकाशात त्याचे पंख पसरवण्याची उत्सुकतेने वाट पाहत आहे. गरज आहे ती त्यांच्या पंखाना बळ देण्याची.

तरूण म्हणजे काय तर ‘ लाथ मारेल तिथं पाणी काढीन ‘ हे अस वय असते की जे ठरवल ते होते. आपण ऐतिहासिक महापुरूषापासुन ते अगदी आजच्या नेत्यांचा , उद्योगपती, कलाकार, लेखक, खेळाडू, साहित्यिक, विचारवंत यांचा अभ्यास केला आणि विचार केला तर लक्षात येते की त्या सर्वांनी त्यांच्या तारूण्यात खुप धडपड, खटपट केली आहे आणि या उंचीवर पोहचले आहेत.‘

तारूण्याची ज्यांनी किंमत ओळखली ते सर्वजण समाज, देश यांच्यासाठी आदर्श असतात. खरे तर प्रत्येक देशाच्या विकासाचा प्रगतीचा गाडा हा तरूणांच्या खांद्यावर असतो. आज आपल्या भारतीय तरूणांचा विचार करण्यात आला तर लक्षात येते की, आपले तरूण कुठे आहेत. गावापासुन ते शहरापर्यंत विचार केला तर प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात येते ’’नवीन आलेले कोणतेही तंत्रज्ञान कला, विज्ञान, गोष्टी यांना लगेच आत्मसात करण्याचे कौशल्य हे प्रत्येक तरूणाकडे आहे. मोबाईल हे सर्वात मोठे उदाहरण कुठेही बसून जगाशी नाते जोडण्याचे तंत्रज्ञान किती लवकर स्वीकारले गेले आणि त्यातून आजचा तरूण युवक हा एकजुट होत आहे. आणि नवीन गोष्टीच्या शोधात सतत खटपट करत आहे.

हे मोबाईल तंत्रज्ञानाचा उपयोग करून मागील ५ वर्षापासुन आपण जागतिक आणि राष्ट्रीय स्तरातील तरूणाचा अभ्यास केला तर एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते की ही तरूणाईची शक्ती केवळ राजकीय क्षेत्रात बदल आणि स्वार्थासाठी उपयोग करून घेण्यात आलेला आहे. २०१४ चे लोकसभा, विधानसभा, अण्णा हजारे यांचे लोकपाल बिलसाठी असलेले आंदोलन, विविध आंदोलन आणि अश्या भरपुर घटना आहेत त्या केवळ तरूणांच्या मदतीने यशस्वी झाल्यान त्यातुन एक गोष्ट निदर्शनास येते ती म्हणजे तरूणाईला बदल आवडतात. काही तरी चांगले व्हायला हवे हे पूर्ण प्रामाणिक पणे वाटते त्यामुळे ते सर्वागाने झोकून कार्यरत असतात. राजकीय लोक हे ओळखुन असतात आणि त्यांचा उपयोग पण हे सर्व राजकीय क्षेत्रात दिसुन येते.

तरूण लोक ताकदी असतात. परंतु ते योग्य दिशानिर्देशित केले पाहिजेत हे सर्व जग जाणून आहे. सर्वात वाईट शत्रु एखादे वेळेस हानी देणार नाहीत. परंतु भ्रष्ट तरूण कदाचित समाजाला अधिक हानी पोहचवु शकतात. आणि देशाच्या भविष्यावर अवलंबून राहणे हे तरूणांच्या खांद्यावर आहे कारण ते नवीन मुल्ये, नवीन विचार आणि जीवनातील नवीन मार्ग दर्शवतात.

राष्ट्राच्या भविष्यातील कल्याण त्याच्या तरूणांच्या हातुन सुवासिक फुलणारे आढळते. युवकांनी प्रत्येक परिस्थितीत भारताच्य पुनर्वसनाची जबाबदारी वैयक्तिक खांद्यावर घ्यावी.

सध्याच्या परिस्थितीत नेमके हे आवश्यक आहे की, युवकामध्ये असलेली अत्यंत गुप्त देशभक्ती आणि राजनैतिकता बाहेर आणणे जे जबाबदारीची आण पेटवते आणि राष्ट्रांच्या उद्धारासाठी त्यांनी समर्पण करेल. आधिुनिक भारताच्या वाढीला अडथळा आणणारे प्रमुख कारण म्हणजे

१) दहशतवाद २) भष्ट्राचार ३) सांप्रदायिक असमानता आहे.

आजच्या समाजाने स्वत:ला तरूणांच्या विचारा प्रमाणे ढाळावे कारण जुन्या पिढीसाठी नवीन विचार करणे कठीण आहे. तरूणांनी भविष्यात आशा आणि आत्मविश्वासाने पाहणे आवश्यक आहे. त्यांच्यामध्ये काम करण्यासाठी आत्मविश्वास असणे आवश्यक आहे. आणि इतरांना अनुसरण्यासाठी मार्गदर्शन करण्याची भावनादेखील असणे आवश्यक आहे.

आजच्या तरूणासमोरील आव्हाने ही गरीबी, बेरोजगारी, बेकारी, स्थिरता आणि सर्व प्रकारचे विभाजनकारी शक्तीपासुन स्वत:ला आणि देशाला मुक्त करणे.

किंबहुना जुन्या पिढीतील नागरिकांना एक नवीन मार्ग स्वीकारणे अवघड आहे. तरूणाना मात्र हे कठीण नसते. परिस्थितीच्या मागण्यानुसार ते त्यांच्या कल्पनाचा अवलंब, फेरबदल आणि बदल घडवू शकतात. म्हणून भारतातील तरूणानी त्यांच्या जबाबदारीला त्यांच्या खांद्यावर घ्यावे.

तरूणांना त्यांच्या शक्तीची जाणीव होणे आवश्यक आहे. त्यांना ती शक्ती दाखवायला हवी आणि त्या शक्तीचा उपयोग लोक कल्याणातून राष्ट्रकल्याणासाठी करणे आवश्यक आहे.

आज जर तरूण मोठ्या प्रमाणात कोठे आहे याचा शोध घेतला तर लक्षात येईल, राजकारणातला कार्यकर्ता आंदोलक, बेरोजगार, दिशाहीन, समाज माध्यमातुन सक्रीय स्पर्धा परिक्षेतुन चांगले जीवन मिळेल या आशेवर शहरात येऊन पडलेला आहे. आज अगणित तरूण अभियंत्याची संख्या भारतात आहे, परंतु हे सर्व खरेच नवे काही करण्यासाठी वैचारीक आहेत का? हा संशोधनाचा विषय आहे.

राजकीय आणि नोकरी या दोन क्षेत्रांव्यतिरिक्त असलेली दुनिया दिसणे आवश्यक आहे. भारत हा कृषिप्रधान, खेड्यांचा आणि तरूणाचा देश आहे हे सर्वसामान्य सत्य आहे. परंतु कृषिप्रधान देशात नवयुवक हे कृषी क्षेत्रातील अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करत आहेत हे खुप कमी दिसुन येते. तरूण कृषी – खेडी या तिघांनी एकत्रितरित्या येणाऱ्या काळात कार्य केले तर भारत हा विकसनशील या ओळखीतुन विकसित देश होणे कठीण नाही.

तरूण म्हणजे नव कल्पनांनी, स्वप्नांनी, विचारांनी, चालणारी खाण आहे आणि त्या खाणेची एक मोठी वेगवान नाव आहे. तिचा वेग हा काळाच्या कित्येक पटीने पुढे असतो. ज्यांना ही खाण भेटली आणि दिशा मिळाली त्यांनीच या पृश्वीला एक ओळख आणि कल्पनेचे ठिकाण म्हणून घडवले आहे.

देशातील एकूण चौकस त्यांना कुठेही कोणीही आडवु शकत नाही. गरज आहे त्यांना त्यांचे स्वप्न पाहण्याचे स्वातंत्र्य आणि पुर्ण करण्याची ताकद देण्याची.

'' तरूण – कृषी आणि खेडी हे प्रगत भारताचे केंद्रबिंदू आहे. ''
'' या तिघांचा विकास.... देशाचा विकास....''

**" जय हिंद, जय महाराष्ट्र"**

सतिश सारंगे
टी.ई.सिव्हील



# भारतीय संस्कृती आणि विज्ञान

मनुष्याच्या विविध भावभावनांचा संगम म्हणजेच संस्कृती ! भारतीय संस्कृती ही अतिप्राचीन असून महान इतिहास, विलक्षण भुगोल आणि सिंधु सभ्यता यांमुळेच जगविख्यात आहे. विविध धार्मिक युगांची सुरूवात या संस्कृतीत झाली. हजारो वर्षापुर्वीपासून भारतीय रितीरिवाज, भाषा, प्रथा,परंपरा या सर्वांच्या परस्पर संबंधामधील महान विविधतेचे अव्दितीय उदाहरण म्हणजेच भारतीय संस्कृती.

प्राचीनता आणि शाश्वतता हीची वैशिष्ट्ये आहेत. संपूर्ण जगाला सभ्यतेचा संदेश देऊन सर्वांगीणता, भव्यता, उदारता, प्रेम व अध्यात्म तसेच सहिष्णुता या मूल्यांची बांधिलकी या संस्कृतीने अबाधित राखली आहे. या भारतवर्षातील लोकजीवन विविध कलाक्रमानूसार बदलत आले आहे. इथे अनादी काळापासून उत्कृष्ट राजर्षी, अध्यात्माची शिकवण देणारे महर्षी, महान काव्य व ग्रंथरचना करणारे कवी व लेखक होऊन गेले. भारतात जवळपास ४१५ भाषा बोलल्या जातात. विविध धर्म, व्यवसाय, वर्णप्रणाली, उत्सव, रितीरीवाज, वेषभूषा, विविध कला, खेळ आहार या सर्वांची अनोखी विविधता असूनही एकता खरंच आजतायात टिकून आहेत.

'भा' म्हणजे दिव्यज्ञान व रत म्हणजे तल्लीन अशाप्रकारे दिव्यज्ञानदानामध्ये व अध्ययनामध्ये तल्लीन असणाऱ्या या संस्कृतीला एके काळी 'वैदीक संस्कृती' या नावानेही ओळखले जाई. ही संस्कृतीअतिउच्च ज्ञानाचे केंद्र असणाऱ्या नालंदा व तक्षशिला या विद्यापीठाच्याअस्तित्वावेळी होती.

या संस्कृतीनेच तर जगाला अनेक शोधरूपी वरदान बहाल केले. जर विज्ञानाचा विचार केला तर सभ्यता किंवा संस्कृतीपेक्षा विज्ञान कधीच वरचढ ठरू शकलेले नाही. परंतु मानव समाजाच्या सर्वांगिण प्रगती आणि विकासासाठी संस्कृतीक सभ्यता आणि विज्ञान दोन्हींना एकाचवेळी प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे. हल्लीच्या वाढत्या वैज्ञानिक प्रगतीपथावर चालताना आपण प्रत्येक क्षेत्रातील सुखवस्तू गोष्टींचा प्रचंड वापर करत आहोत. पण प्राचीन भारतीयांच्या विज्ञानातील योगदानाबद्दल विसरून चालणार नाही. संस्कृती बरोबरच सर्वच क्षेत्रातील विज्ञानाची परंपरा हेच तर भारताच्या समृध्दीचं रहस्य आहे.

कित्येक सिध्दांत आणि तंत्रांचा शोध या संस्कृतीतून उदयास आला. ज्यामध्ये शून्याची संकल्पना, दशांश पद्धत, संख्यावाचक संकेतलिपी, दुहेरी संख्या अणूसिद्धांत, ग्रहसिध्दांत, एकसंध धातू पद्धती, कायाकल्प (Plastic Surgery), मोतीबिंदू शस्त्रक्रिया, आयुर्वेद इ. विज्ञानजगताच्या संशोधनाच्या विषयी वर्णन आहे.

याबरोबरच अंतरिक्ष, गुरूत्वाकर्षण, विमानशास्त्र इ. सखोल बाबींविषयी वर्णन शास्त्रांमध्ये आढळून येते. ज्याकालखंडात वैदीक संस्कृतीचे अस्तित्त्व होते, त्यावेळी समृद्धी, अध्यात्म, ऐश्वर्य हे जणू दुथडी भरून वाहणाऱ्या नंद्याप्रमाणे वाहात होते.

कालांतराने या संस्कृतीस ग्रहण लागावयास सुरूवात झाली. सर्वत्र दृष्ट प्रवृत्तींचा प्रसार होऊ लागला, कारण अत्याचारी आणि जुलूमी सत्ताधाऱ्यांनी भारतीय संस्कृतीवरच आघात केला. रूढी व रितीरिवाजांच्या जंजाळात अडकलेल्यांनी अध्यात्माच्या नावावर जातीवादाच्या प्रवृत्तींना प्रसारीत केले. मुघलांच्या अतोनात गुलामीनंतर या संस्कृतीची कंबर मोडली. ती इंग्रज राजवटीमुळे, भारतीयांच्या मूलभूत श्रध्देवरच त्यांनी प्रहार केला. त्यामुळे हळूहळू स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या संस्कृतीचे रूपांतर पाश्चात्य जीवनशैलीत होऊ लागले.

भल्या पहाटेच्या सुंदर प्रार्थना, गोरक्षा – कृष्णी आणि वाणिज्य, धर्मतत्त्वे, नैतिक मूल्ये, पंचमहाभूतांची आराधना या मूल्यांचा संदेश देणाऱ्या संस्कृतीचा हळूहळू लोप पावत गेला.

याऊलट २१ व्या शतकातील विज्ञान आणि तंत्रज्ञानातील नवनवीन शोध, जीवनमानातील अमूलाग्र बदल व पाश्चात्य जीवनशैलीच्या मिश्या आणि अनुकरणामुळे सर्वत्र वाईट कृत्यांचा शिरकाव वाढत आहे. सध्याचे युग हे परिवर्तनाचे आहे. हे जरी खरे असेल तरी वाढते उग्र कारखाने, नद्यांचे तीव्र प्रदुषण पर्यावरणातील वसुंधरेचा ऱ्हास

वाढतो आहे. भ्रष्ट्राचाररूपी कलंक भारताच्या अभिमानाला पोखरत चालला आहे. तसेच वाढत्या भोगविलासाच्या जीवनशैलीत भृणहत्या, गोहत्या, वाढती वृद्धाश्रमे, स्त्रीयांवरील अत्याचार, चोऱ्या–दरोडे, व्देष व मस्तरी भावनेतून होणारे खून, बेरोजगारी, ताणतनावातून उद्भवणाऱ्या आत्महत्या, असंतुलीत पर्यावरणामुळे ऋतूमधील बदलते सातत्य, धार्मिक हिंसाचार या कुप्रवृत्तीचा तर आलेख वाढतच चालला आहे. भारतीय संस्कृतीच्या आदर्श संस्कारांचा अभाव हेच या आधुनिक समस्यांचे कारण आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

तरी या भारतीय संस्कृतीच्या पुन: अनुकरणाने या समस्यां नक्कीच कमी होतील. सर्वच घटकांची जबाबदारी आहे, पुन्हा भारतभूला सुजलाम – सुफलाम करण्याची !

‘‘ या माझ्या भारतदेशी सुखस्वप्ने फुलूनी यावीत ‘‘

नितेश येडे
बी.ई.सिव्हील

# आधुनिक भारतात युवकांचे योगदान

कालपर्यंत असा कुठल्याही प्रकारचा लेख लिहून किंवा नेतेगिरी करण्याचा खरोखरच मनात कुठलाही विचार नव्हता. चालतय ना चालू द्या. बऱ्याचशा गोष्टी दिसत होत्या डोळ्यांना. पण जाणूनबुजून केले गेलेत दुर्लक्ष. आपण करून करून तरी काय करणार? आपल्याला काय करायचंय? हे करून तरी काय करणार? असं काय ह्या एकाच ठिकाणी होतेयं का? असं करून तरी किती फरक पडणार आहे? असे अनेक प्रश्न नक्कीच आपल्या सर्वांनाच पडत असणार किंवा आपण हे प्रश्न तयार करतो. आजकालच्या धावपळीच्या जगात आपलं काम भलं आणि आपण भलं. ही युवकांची एक टॅगलाईन बनत चाललीय.

परंतु कालचा प्रसंग असा का वेगळा ठरला की सकाळी उठून आपोआप कागदावर हात फिरू लागले. तर झालं असं की, नेहमीप्रमाणे कॉलेज आणि घर व आसपासचा परिसर सोडून गेलो होतो. एक कॉलेज टेक्निकल फेस्टिव्हल अटेंन्ड करण्यासाठी. नेहमीसारखा कार्यक्रम आटोपून जाताना सर्व मित्रांनीमिळून जिंकलेल्या मित्रांच्या Prize Money लुटण्याचा बेत आखला. हॉटेलमध्ये कोल्ड्रींक्स पित सेल्फी काढत बसलो. आमचं आटोपल्यावर जाताना दिसलं की, एक मुलगा असेल ११–१२ वर्षाचा. टेबल साफ करण्यासाठी आला. मनात ते टोचल्यासारखे झालं. काय फरक आहे? आपल्यात व ह्या मुलात? नक्कीच घरची परिस्थिती. परंतु जे आपल्याला मिळत आहे ते त्याला का नाही? भारताचा तो ही एक भावी शिल्पकार पण त्याचं आयुष्य आणि त्याच्या वडीलांचं आयुष्य ह्याच्यात नखात मावण्याइतकाच फरक असेल व जर पुढे जीवनात बदल घडला नाही तर कदाचित त्याच्या मुलांचाही तेच असा विचार मनात येताच बोलण्याची इच्छा झाली. सोबतच्या मित्राशी सहज एक प्रश्न केला की, 'का रे, ह्या मुलाचं आयुष्य बघ ना?' प्रश्नाचं उत्तर असं होतं की, वेळ आणि परिस्थिती माणसाला सर्वकाही करण्यास भाग पाडते. पोटात अन्नाचा कण नसेल तर शरीराला कष्टाचं ओझ वाटत नाही. हे ऐकून जरा मन स्टेबल झालं.

परत आमचं जे चालू फोटोसेशन होतं ते पुन्हा चालू झालं. घरी आलो पण रात्री झोप येईना झाली. मग आठवेलं की कॉलेजच्या मॅगझिनचा लेख. कागद घेऊन सुरू झालो. मग कळालं की, चुकलं त्या ठिकाणी थांबणं हे आतापर्यंत शिकलेल्या व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्यविकास, मूल्यशिक्षण यासारख्या सर्व विषयात लिहिलेल्या सर्व उत्तरांना एकदम विरोधाभासी होत.

एक Good human being जे आपण लाहनपणापासून बनवण्याचा प्रयत्न करतो. त्या सर्वांना परिस्थिती विरोधाभासी होती. काही नाही पण त्या मुलाला त्याच्या ह्या सर्वामागचं कारण विचारणं तरी आमचं कर्तव्य होत. मनात आलं होत. पण असं वाटलं की ह्या कॉलेजमध्ये मोठमोठे पि.एच.डी., मास्टर्स, बॅचलर एवढ्यापर्यंत शिकलेल्या माणसांनी हा प्रयत्न नसेल केला का? असो. पण प्रत्येकाला शिक्षणाचा मुलभूत अधिकार व हक्क मिळणे क्रमप्राप्त आहे.

कर्मवीर अण्णाभाऊ साठे यांच्या रयत शिक्षण संस्थासारख्या अनेक Site आहेत ज्या अशा मुलांना 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत शिक्षण मिळवून देऊन त्यांचे जीवन सुधारण्याची संधी देतात. दररोज कुठल्याही Construction Site वर बघा दिसतीलच असे बरेच आधुनिक युगाचे शिल्पकार विटा आणि सिमेंट उचलताना दिसतील. ह्या लोकांचं आयुष्य हे एका ठिकाणी Stable नसतं. जसं काम तशी त्यांची राहण्याची जागा बदलत जाते. लहान बाळांना कमरेवर बांधून काम करणाऱ्या स्त्रियांना त्यांना हवे असणाऱ्या किती अधिकारांचा लाभ मिळत असेल?

सरकारी योजना येतात आणि आता तर म्हणे सर्व काही Digital आहे. '' Digital India '' पंतप्रधानांची नवी टॅगलाईन विकासाला आमच्या नव्या पिढीचा विरोध नाही. परंतु ज्या लोकांना Electricity सारख्या मुलभूत सोयीचा नामशेष माहित नाही त्यांना Internet & all लांबच.

बरं ही सगळी झाली सद्यस्थिती. तर यावर उपाय काढणं नक्कीच आपल्या युवकांच काम आहे. फक्त वेगवेगळ्या Poses मध्ये Selfies काढून Likes मिळवणं हे आजच्या पिढीचा उद्देश बनत चाललंय. Whatsapp ला Dp's बदलून व Facebook ला असल्या फोटोवर Comment करून आपलं काम संपत नाही. आजकाल तर मला कळत नाही, एखादा फोटो एकदम भावनाशुन्य करून टाकणारा असतो त्यालाही काहीजण Likes करतात. असो.

तर यावर मला उपाय असा दिसतो की, अशा मुलांना त्यांचे दु:ख समजुन घेण्याचा एक प्रयत्न आपणाकडून झाला पाहिजे. त्यांच्या पालकांशी चर्चा करून त्यांच्या विकासासाठी एक घोटस पाऊल प्रत्येक युवकांकडून उचललं जायला हवं. आधुनिक भारत घडवताना शहरं स्मार्ट बनत चाललीत. एवढंच काय आता मोबाईल फोन्स सुध्दा "Smart Phones" बनत

चालले आहेत. पण यासर्वात मागे पडलेल्यांना सोबत घेऊन जाणं हाही नक्कीच प्रयत्न हवा.

आजकाल एक नवी संकल्पना निघत चालीय, Garbage माहित नाही, बहुतेकांना ठाऊक असेल. जशी Selfie असते तशी आपल्याला कचरा दिसतोय हा काढायला हवा, तर तो होता तेव्हाचा फोटो आणि तो तुम्ही प्रत्न केलानंतर साफ झाल्याचा फोटो # KBC Garbage करून टाकलात तर नक्कीच अशा हजारो Garbage सोबत हाजारो ठिकाणं स्वच्छ होण्यास मदत होईल. तर चला एक पाऊल पुढे टाकुयात बाहेरच्या देशांच कौतुंक करण्यात आपल्याला जशी मजा वाटते व आपल्या देशावर बहुतेकांना टीका करणं सोपं वाटतं, तर त्यांनी सुध्दा देशाची कौतुक करण्याची संधी चालून येत आहे. असं समजून काम करावं.

कॉलेजच्या Group Discussions मध्ये बरेचसे प्रश्न उपस्थित होतात. त्यावर सर्व आपापले मत मांडतात. शेवटी Conclusion काढतो व सर्व विसरून प्रत्येकजण पुन्हा आपल्या कामाला लागतो. त्यातील एक प्रश्न म्हणजे '' सरकारी अधिकाऱ्यांची भ्रष्टाचारवृत्ती '' त्यावर उपाय निघाला होता, तो म्हणजे Anti - Corruption Bureaus. एक Official Website आहे. त्यावर आपण अशा अधिकाऱ्यांची एक Complaint नक्कीच भरू शकतो. व त्यावर चालू असलेल्या कामाचं Status ही बघू शकतो. विशेष म्हणजे आपलं नाव नक्कीच गुप्त राहणार व प्रश्न सोडवण्याची हमी असते.

असे बरेचशे प्रश्न आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनात बघत असतो. तर आजपासून एक संकल्प करूया की प्रत्येकाने एक तरी प्रश्न जबाबदारीपुर्वक हाताळावा. भारतात आपल्यासारखे करोडो युवक आपल्याला बघून प्रभावित होतील व नक्कीच प्रश्न आपल्या एकूण युवकांच्या संख्येपेक्षा कमीच करू. यात आपल्या सर्वांना प्रिय Facebook & Whatsapp चा योग्य उपयोग करू. Digital India संकल्पनेला सार्थ करूया.

आमच्या वर्गातील व PK Technical Campus च्या प्रत्येक वर्गात हा उपक्रम पोहचवण्याची जबाबदारी घेण्यास आम्हाला नक्कीच आवडेल. आजच्या युवकांच्या शक्तीचे प्रदर्शन करण्याची हीच योग्य वेळ आहे. व मला नक्कीच आशा आहे की हा लेख वाचून नक्कीच इच्छुक विद्यार्थी आम्हाला Join होतील व '' ए.पी.जे. अब्दुल कलामांचे २०२० स्वप्न '' आपण सर्व मिळून सार्थ करण्यासाठी एक उचलते पाऊल टाकुयात व २०२० पर्यंत आपला भारत 'अमेरिका' व रशियाच्या वरचढ महासत्ता बनवण्यासाठी मनापासून व तन-मन -धन अर्पण करून शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सर्वजण शिवप्रतिज्ञा करूयात.

**।। जय भवानी, जय शिवाजी ।।**

राहुल कोके
टी.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा

# भारताच्या विकासातील तरुणांची भुमिका

युवा म्हणजे काय हो विज्ञान म्हणते की, १५ ते ४० वयोगटातिल मुले मुली म्हणजे युवक ''. खरच का युवा फक्त वयाच्या फरकांनी किंवा केसाच्या रंगांनी ओळखता येतो. कोणी तरी महान व्यक्तिमत्व सांगून गेलेत जो व्यक्ति विचाराने युवा असतो तोच खरा युवा असतो. या गोष्टी शी मी सहमत आहे. कारण युवा विचारच देशाला एका विशेष स्थानावर नेऊ शकतात.

आपल्या देशातील मुळ लोकसंख्येच्या ६५% वर्ग हा युवा आहे. आजच्या भारताची ओळख ही युवकांचा देश म्हणून ओळखला जातो अणि बघायला गेल तर युवकच आपला देश चालवत आहेत. कोणत्याही देशाच्या किंवा आपल्या भारताच्या सर्वांगीण विकासासाठी त्या देशाला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि संरक्षण क्षेत्रात बळकट बनवतील ते सविस्तररित्या मांडतो.

१) सामाजिक : आपल्या देशाला खुप जुना सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. आपल्या भारतात वेगवेगळ्या धर्माची लोक सुखात राहतात एकमेकांचे सण मोठ्या उस्ताहाने साजरे करतात. एक एकमेंकांच्या सुखा–दुखा:त कामी येतात म्हणून आपल्या देशाची ओळख ही धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून जगासमोर आहे. आणि हीच एक मोठी जिम्मेदारी आजच्या भारतीय युवकांवर आहे. त्यांना आपले सामाजिक हित जोपासने गरजेचे आहे कारण आपल्या देशाच्या विकासा सोबत एक चांगला समाज काय असतो याचे उदाहरण जगासमोर दिसले पाहिजे. तसही प्रत्येक युवकाने आपल्या मनात आपला धर्म हिंन्दु, मुस्लिम, जैन, शीख, बौध्द न समजता आपण भारतीय आहोत हे जर मनात रुजवल तर एक जात–रहीत समाज निर्माण होईल आणि जातीय दंगली निर्माण होण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही. यातुनच सामाजिक सलोखा राखता येईल.

२) राजकीय : भारताच्या विकासाचा महत्वाचा भाग म्हणजे राजकारण. या विषयावर खुप चर्चा झाल्यात टी.व्ही. न्यूज चैनल वर तासंतास वादविवाद झालेत. पण खरच का युवा राजकारणात जाण्यासाठी इच्छुक आहे का तर खुप जणांचे उत्तर नाहीच म्हणून येईल. कारण त्यांच्या दृष्टीने राजकारण म्हणजे सामान्य लोकांचा खेळ नाही अशी शिकवण आपले मोठे लोक आजच्या युवकांना देतात मग आपले युवक–युवती राजकारणाच्या दूर जाऊ लागतात. युवकांचे राजकारणातील महत्त्व मा. स्व. पं. राजीव गांधी यांनी ओळखले होते. म्हणून तर त्यांनी मतदानाचा हक्क वय १८ वर्ष केला कारण युवकांना आपल्या आवडीचे सरकार निवडून देता येईल. सध्य स्थिती ला भारताच्या राजकारणच्या युवा नेतृत्वाची गरज आहे. कारण बरेच असे प्रश्न आहेत जे की ते सध्याचा कोणताच राजकीय नेता ते प्रश्न सोडवत नाही त्यांची फक्त निवडणुकीसाठी ची आश्वासन असतात. यामुळे भारताचा विकास मंद गतीने होतोय.

३) शैक्षणिक : स्व. राष्ट्रपति डॉ. अब्दुल कलाम सर भारत हा महासत्ता झाला पाहीजे असे त्यांचे स्वप्न होते. आपण नक्की त्यांचे हे स्वप्न पूर्ण करूया कारण त्यांनी जे देशासाठी केलय त्याला या पेक्षा चांगली मानवंदना नाही. पण त्यांचे हे स्वप्न आपण कस सत्यात आणनार यासाठी भारताचा शैक्षणिक विकास होणे गरजेचे आहे. आता सर्वात मोठा प्रश्न येतो तो शिक्षण म्हणजे काय? शिक्षण म्हणजे फक्त कागदोपत्री पदवी का सध्या तरी या कागदोपत्री पदवी ला महत्व आहे. आजच्या समाजात कुठ गेलो तर समोरच्याची किंमत त्यांच्या पदवी वरून केली जाते. खुप काही युवक तर असे असतात की त्यांच्या आई – वडिलांच स्वप्न असत की आपला मुलगा डॉक्टर, इंजीनियर किंवा वकील बनाव. यासाठी त्याला १० वी पासुन दबाव टाकतात मग तो या क्षेत्रात आपले पाऊल टाकतो. कधी कधी काही युवक –युवती आपल्या पालकांच्या अपेक्षा पुर्ण करू शकत नाहीत मग त्यांना आपल्या पालकांच्या रागाच्या समोर जाव लागत कधी कधी तर मार सुध्दा खावा लागतो या पेक्षा ते आत्महत्या करायला प्रवृत्त होतात. हल्ली वर्तमान पत्रात या गोष्टी आपण वाचतोच की बघायला गेल तर आपल्या मुलगा मोठ्या पदावर जावा ही प्रत्येक पालकांची इच्छा असते. त्यांनीही त्यांच्या वयात ज्या मार्गावरून गेलेत, दुख: सोसले तेच दुख: मार्गावरील काटे आपल्या मुला–मुली ने

सोसावेत अशी त्यांची इच्छा नसते त्यांच्या दृष्टीने उत्तम विचार आहेत त्यांचे पण ते हे विसरतात की वेळे नुसार माणुस जसा बदलतो तसे मार्गा वरील संकट ही बदलतात. स्वातंत्र्या नंतर च्या काळात एक विशिष्ट वर्ग सोडला तर कोणी सुशिक्षित नव्हते तेव्हा त्यांना मार्गदर्शनाची गरज पडत होती पण सध्याच्या युवकांना मार्गदर्शनाची कसलिही गरज नाही त्यांना फक्त तुमच्या आधाराची गरज आहे. तरच देशाचा युवक देशाच्या विकासासाठी आपले योगदान देईल. आता मी म्हणल्या प्रमाणे शिक्षण कोणते घ्यावे ज्याच साध उत्तर आहे त्याची ईच्छा इथे महत्त्वाची आहे. त्याला काय करायचा हे त्याला ठरवू दिले तर तो तेवढ्याच जिद्दीने मेहनतीने शिकेल आणि देशाच्या विकासासाठी आपले योगदान देईल.

४) संरक्षण : भारत आशिया खंडातील सर्वात मोठा देश आहे. भारताच्या संरक्षणासाठी जिम्मेदारी पुर्णपणे भारतीय युवकांवर आहे. भारताला बाहेरील शत्रुपासून खुप धोका तर आहेच पण देशातील शत्रुंच काय. म्हणून तर या दोन्ही संकटाना तोड देणं ही सर्वात मोठी जिमेदारी युवकांवर आहे. आता बाहेरील शत्रु म्हणजे कोण हे तर सर्वांना माहिती आहेत. चीन, पाकिस्तान आणि बांगलादेश हेच ते बाहेरील संकट आपण हल्ली वर्तमानपत्रामध्ये वाचतोच की चीन ची घुसखोरी किंवा पाकिस्तान ने शस्त्र संधिचे केले उल्लंघन आणि आपले जवान शहीद झाल्या च्य बातम्या काळजाचा ठोका चुकतो. मनातून राग येतो दुसऱ्या देशांबद्दल. तरीही आपण शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर भारताने जश्याच तशे उत्तर दिलेत ते सर्व आपल्या युवकांच्या विचार आणि बुध्दिमत्तेच्या जोरावर भारातातील युवकांची ताकत सर्व देशांना माहिती आहे.

हे झाल बाहेरील संकटंविषयी. आता आतील संकट देशाला जेवढा धोका बाहेर देशांकडुन नाही तेवढा धोका देशांतर्गत वाद-विवादा कडून आहे. कारण या गोष्टी देशाला खुप मोठ्या संकटात टाकू शकतात. आता या सर्व गोष्टीमध्ये युवक मोठ्या प्रमाणात भरडले जातात. जसे की युवकांना एखाद्या जाती विरोधात भडकवने मग जी रक्ताची होळी खेळली जाते ती आपल्याला चांगलीच माहिती आहे. आपला भारत वेग-वेगळ्या प्रदेशामध्ये विभागलेला आहे त्यालाच आपण राज्य म्हणतो. बरिचशी युवक या प्रादेशिक वादामध्ये फसतात आणि तेही काही लोकांच्या सांगण्यावरून ती लोक आपली राजकीय पोळी भाजुन घेतात पण अडकतो मात्र आपला युवा तरूण वर्ग यामुळे आपल्या देशाची विकासाची गती मंदावते. माझे तर एकच म्हणने आहे की जोपर्यंत आपण जात, धर्म, प्रादेशिक वाद हे सर्व सोडून आपण या अखंड भारताचा एक महत्वाचा भाग आहोत असे समजले तर आपण नक्कीच भारताला महासत्ता करून दाखवु.

हे घटक एकमेकांशी एका साखळी मध्ये बांधलेले आहेत. एकमेकांशिवाय हे कधीच पूर्ण होणार नाहीत तरी युवकांना या सर्व घटकांवर समान विचार करून देशाच्या विकासासाठी आपले मोलाचे योगदान द्यावे.

संकेत कल्याणकर
टी.ई.सिव्हील

# बेटी बचाओ, बेटी पढाओ

' नन्ही बेटी को जीने का वर दो, नन्ही बेटी को जीने का वर दो...
(हुआ बेटा तो ढोल बजाया...
हुई बेटी तो मातम छाया...

नन्ही बेटी को जीने का वर दो किती आश्चर्य कारक आहे . नाही? लेखनाची सुरुवात हि विंवचनेनेच होतीये. '' नन्ही बेटी को जीने का वर दो'' खरं तर मुलगा काय किंवा मुलगी काय दोघं ही त्याच आई वडिलांची मुलं. पण मुलाला अभिमानानं वाढवल जात आणि मुलीचा जन्मच नाकारला जातो. मुलगी म्हटलं की सगळ्यांच्याच चेहऱ्यावर एक नकारात्मक भाव दिसतो. कधी तिला हसत स्विकारल जात नाही. कायम नाक तोंड मुरडल जातं. ही नकारात्मक मानसिकता का असते?

'' बाप म्हणे बेटी तु साखरेच पोतं, परि तुझ्या नशिबाला जामीन कोण होतं? ''

जानेवारी २०१५ रोजी हे अभियान सुरू झालं. खरं तर हे अभियान सुरू व्हायला हवं होत का? पण नाईलाज '' बेटी बचाओ '' का हे सांगावं लागतयं. मुलगी वाचवा का तिला जगण्याचा अधिकार नाकारला जातो? विचार केला तर स्त्री शिवाय जीवन केवळ अशक्य आहे. कारण एकटा पुरूष कुठल्याच बाबतीत समर्थ नाही. तो केवळ एक जीवनाचा आभास असेल स्त्री शिवाय जीवन.

'' लई झाल्या लेकी, नको म्हणु बापा
उडूनिया जाईल तुझ्या जीवनाचा धब्बा ''

मुलगी नको हे ठरवताना हा विचार का नाही केला जात की, आपली सुन ही पण कोणाची तरी मुलगीच आहे. तर तिच्या जन्माच्यावेळी तिच्या आई – वडिलांनी हा विचार केला असता तर? तुमच्या घरात मग सून म्हणुन कोण आलं असतं? तुमच्या वंशाचा दिवा कोणी जन्माला घातला असता. पुरुष त्यासाठी कितीही कारक असला तरी ते स्त्री शिवाय केवळ अशक्य आहे. कारण निर्मितीची क्षमता फक्त स्त्री मध्येच आहे. मग तिचा जन्मच का नाकारायचा? मुलगी म्हणजे आनंद. मुलगी म्ह ण ज ` चैतन्य. मुलगी म्हणजे दिवटी. मुलगी म्हणजे साक्षात जगदंबा सरस्वती.

मग तरीही तिला का नाकारलं जातं? तिलाही पहायचे असतात फुलांचे रंग पहावेसे वाटते निसर्ग सौंदर्य. ऐकावेसे वाटतात. पाखरांचे आवाज. पण केवळ एक नकारात्मक नामसिकता हे सगळ चिरडून टाकते. आज जर स्त्री जन्मच नाकारला असता तर आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले, मदर तेरेसा, सानिया मिर्झा, पी.व्ही. सिंधू या जन्मालाच आल्या नसत्या आणि घडल्याही नसत्या. मुलगी एक संस्कृती आहे. एक नाविन्य आहे. एक चैतन्य आहे.

आज किती तरी क्षेत्रात आपलं नाव मोठं करणाऱ्या अनेक महिला आहेत.

'' इंद्रधनुष से सजेंगे रंग, जब संग होगी बेटी की तरंग ''
कई तरह गिरते है और गिराते है बेटे
और सम्भाल लेती है बेटियाँ,
सुख के सपने दिखाते है बेटे, जीवन का यथार्थ
होती है बेटियाँ, जीवन तो बेटों का है और मारी जाती है बेटियाँ !

मुलीचा जन्म हा सर्वात आनंददायी क्षण आहे. कारण तिच्या येण्याने एक नाविन्य चैतन्य निर्माण होत. वडिलांची सर्वात जास्त काळजी ही मुलीकडून घेतली जाते. म्हणुनच मुलीच्या रूपात त्यांना एक आई पुन्हा नव्याने अनुभवायला मिळते.

मुलीचा जन्मच नाकारणारी अतिशय दुदैवी घटना मुंबईच्या जे.जे.रुग्णालयात घडली. एक महिलेला जुळे मुलगा–मुलगी झाले. हे तिलाकळले तेव्हा तिने नवजात मुलीचे अर्भक चौथ्या मजल्यावरून खाली फेकून दिले. क्षणाचाही विचार न करता केवळ मुलगी नको म्हणून तिच्याच आईने तिला पुर्णत: नाकारले.

पण जर मुलगी नको केवळ मुलगाच हवा हा विचारच समाजाचा पाया खिळखिळा करणारा आहे. केवळ मुलगा किंवा पुरूषांच्या आधारावर ही सृष्टी चक्र चालणे अशक्य आहे. कारण स्त्री – पुरुष ही जीवनसृष्टीची समान चाक आहे. त्यातल एक जरी निखळलं तरी दुसऱ्याला ते सावरण जवळ – जवळ कठीणच आहे. या सृष्टी चक्रात परमेश्वराने स्त्री पुरुष या

दोघांनाही समान हक्क, अधिकार दिले आहेत. मग स्त्रीयांना, मुलींना ते हक्क नाकारणारे आपण कोण? ‘‘कोख को कब्र न बनाए , खुशी खुशी बेटी को दुनिया में लाए !‘‘

मुली स्वत:च्या कर्तृत्वाने आज खुप मोठी झेप घेत आहे. आणि असचं कर्तृत्व अणि झेप घेण्यासाठी तिला हवा आहे फक्त तिचा जन्माला येण्याचा अधिकार. यासाठी आज मुलगी नको ही मानसिकता बदलायला हवी. मग तिलाही मिळेल एक आकाश उंच झेपावण्यासाठी. एक क्षितिज गाठण्यासाठी तिच्या येण्याणे उजळुन जातील दाही दिशा. मग ती ही अभिमानाने म्हणेल

" I am not a just Girl, i will be The Girl "

नको मारू आई मला जन्म हा घेऊ दे,<br>
तु जसे पाहिले जग तसे मलाही पाहु दे,<br>
परमेश्वर प्रत्येकाच्या घरी जाऊ शकत नाही,<br>
त्याजागी तु आहे कसे तुला कळत नाही,<br>
ताई सवे माझ्या मला आनंदाने न्हाऊ दे,<br>
नको मारू आई मला जन्म हा घेऊ दे.<br>
तु बहीण, तु कन्या, तु एक स्त्री आहेस,<br>
काल जिथे तु होती आज तिथे मी आहे,<br>
तु जसे विणले नाते तसे मलाही विणु दे,<br>
नको मारू आई मला जन्म हा घेऊ दे.<br>
पहा फिरूनि मी पुन्हा कधी येणार नाही,<br>
भाग्य कन्यादानाचे आई तुला देणार नाही<br>
डोळे येता भरून तुझे पदर मला होऊ दे,<br>
नको मारू आई मला जन्म हा घेऊ दे.

शेवटी एकच म्हणेन ‘‘ बेटिया तो जिंदगी का एहसास होती है !‘‘<br>
इसलिए,

**" बेटी के जन्मपर उत्सव मनाओ, पढा लिखाकर काबिल बनाओ ! "**

प्रतिक कड<br>
टी.ई.सिव्हील

# भारतीय संस्कृती आणि विज्ञान

"पवित्र भुमी" या संकल्पनेने भारतीय संस्कृतित फार मोठी भर घातली आहे. भारतीय संस्कृती ही सर्वश्रेष्ठ व अत्यंत जुनी संस्कृति आहे. भारतीय संस्कृतीचा विचार करता, भारतीय संस्कृतिने हिंदु धर्मभावाला एक वेगळा आकार दिला आहे. संतकवीनी हिंदु धर्म आणि तत्वज्ञान समृद्ध केले आहे, परंपरेला नवा अर्थ लावला, आणि परिवर्तनाला चालना मिळवून दिली. यामध्ये संत तुकारामांचे अभंग (मराठी), बसवाची बचने (कानडी), आणि त्यागराजाच्या कृती (तामिळ) भारतीय परंपरेची अमुल्य ठेव आहे. याचबरोबर नरसी मेहतांनी गुजरातीमध्ये भक्तीगीते, कनक,परंदरदास यांनी कानडीतील भक्तीगीते लिहीने. भारताला खुप मोठी संस्कृती लाभली आहे. अगदी रामायण, महाभारतापासून भारतीय संस्कृती पुढारलेली आहे. भारतीय संस्कृतीत उत्तर, दक्षिण, पश्चिम, पुर्व या प्रदेशाचा महत्वाचा वाटा आहे.

भारतात प्रत्येक भागात वेगवेगळी संस्कृती आढळते. कीर्तन हा प्रकार भारतभर लोकप्रिय आहे. विशेषत: महाराष्ट्र, पश्चिम बंगाल या प्रदेशात आढळतो. कव्वाली ही इस्लाम धर्माची देण आहे.

उत्तरेकडील हिमालय हे देवांचे वसतीस्थान समजले जाते. अनेक महान योगीनी या ठिकाणी तपश्चर्या केली आहे. हिंदुचा विचार करता त्यांची प्रामुख्याने चार तीर्थक्षेत्र चार ठिकाणांना स्थापित आहे. पुर्वेला पुरी (आसाम), पश्चिमेला व्दारका ( गुजरात), दक्षिणेकडे रामेश्वर (तमिळनाडू) आणि उत्तरेला बद्रीनाथ (उत्तर प्रदेश). यांबरोबर इतर अनेक पवित्र स्थळे आहेत. पंढरपुर, त्र्यंबकेश्वर, हरिव्दार, गया, प्रयाग, पाराणसी (बनारस), मदुराई, तंजावर, कन्याकुमारी, भीमाशंकर, पैठन, अशी अनेक प्राचीन पवित्र स्थळे भारतात आहे. भारताची संस्कृती ही प्रदेशानुसार बदलत असते. उदाहरण म्हणजे मराठी भाषा, दर १६ मैलावर भाषा बदलत असते. तिच्या उपभाषामध्ये (खानदेशी, वऱ्हाडी, कोकणी) इत्यादी. भारतात फक्त हिंदुच्या संस्कृती आढळत नाही, तर अनेक संस्कृतीने इथे आपले पाय रोवले आहे. यामध्ये बौद्ध, हिंदु, इस्लाम, अरबी, ख्रिश्चन, जैन इ. संस्कृती भारतात आंदराने भक्तीभावाने जोपासल्या जातात.

उदा. राजगीर, बोधगया (बिहार), बौध्द संस्कृतीची मंदीरे, तसेच भारतात अनेक जैन धर्माची मंदीरे आढळतात. राजस्थान येथील अबु पर्वत इ.

याबरोबर भारतात पर्वतावर कोरलेल्या लेणी मोठ्या प्रमाणात आढळतात. महाराष्ट्रात अंजिठा, वेरूळ, एलफिस्टन, कार्ले, भाजे, कर्नाटकात बदामी इ. लेण्या आढळतात. मुस्लीमांची मस्जीद, पीर, दर्गे भारताच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात दिसतात. भारतीय संस्कृतीत अनेक राजे – राज्य करून गेले. यात  प्रामुख्याने चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक, अकबर, शहाजहाँ औरंगजेब, राणा प्रताप, राजा रणजित सिंग, मराठा इम्पियर, दि ग्रेट शिवाजी महाराज, संभाजी महाराज, बाजीराव पेशवा, पृथ्वीराज चव्हाण यासारखे राजे अनेक वर्षे राज्य करून गेले. याचबरोबर भारतीय संस्कृतीत फक्त बोटावर मोजण्याइतक्या महिलेना राज्य करता आले, यात प्रामुख्याने पहिली महिला राज्यकर्ती रजिया सुलतान ही होय. यानंतर ताराबाई, अहिल्याबाई, राणी लक्ष्मीबाई या थोड्या वेळापुरत्या सत्तेवर राहिल्या.

भारतीय संस्कृतीत विज्ञान फार मोठे महत्व प्राप्त आहे. अगदी पुर्वीच्या काळापासुन भारतीय विज्ञान जगतात सर्वश्रेष्ठ होते. शुन्य ही संख्या भारताने जगाला दिलेली देणगी आहे. तसेच भारत हा सर्वाधिक राज्यकर्त्याचा देश राहिला आहे. भारतात अनेक इंग्रजानी राज्ये केली. १६०० मध्ये इंग्रजानी भारतात ईस्ट इंडीया कंपनी नावाने व्यापार सुरू करून अल्पवधीतच संपूर्ण भारतावर राज्ये केले. तसेच भारतीय खाणीत निघालेला दि ग्रेट कोहिनुर डायमंड हा १४०० च्या दशकात जगतात सर्वात मोठा आणि अमुल्य असा होता. त्यावेळेस त्याची किंमत होती, सर्व जगाला दहा वेळेस पुरेल इतके अन्न विकत घेता येऊ शकत होते. पण सध्या तो इंग्रजांची राणी विक्टोरिया –२ हिच्या मुकुटात आहे. तो भारताच्या पन्ना (मध्य प्रदेश) या खाणीतून काढण्यात आला होता.

भारतात पुर्वी सोन्याचा धुर निघेल इतकी संपत्ती होती पण इंग्रजानी ती आपल्या देशात नेली. आज भारतीय विज्ञान जगात टॉपमध्ये आहे. जर्मनी, अमेरिका यांच्या नंतर भारतीय तंत्रज्ञानाचा (टेक्नोलॉजीचा) नंबर लागतो. आज भारतीय टेक्नोलॉजी आघाडीवर आहे. आज भारतात ISRO (Indian Space Research Organization ) ही संस्था अवकाश तंत्रज्ञानात भर घालत आहे. या संस्थेने पहिल्याच प्रयत्नात चंद्रयान आणि मंगळयान उडवून सर्व जगाला आश्चर्याचा धक्का

दिला. तसेच भारत स्वतंत्र झाल्यापासून अनेक शास्त्रज्ञानी जीवाचे रान करत भारत उभारण्यास मदत केली. यामध्ये नाव घता येईल असे अमत्य सेन, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, विक्रम राराभाई, डॉ. होमी भाभा, विजय भटकर, जयंत मारळीकर, डॉ. सी. एन. राव अशी अनेक शास्त्रज्ञामुळे भारताच्या विकासाला चालना मिळाली

१९७४ साली भारत दश इंग्राजाच्या गुलामीतून मुक्त झाला. भारताचे प्रथम दोन (१९४७) पाकिस्तान व हिंदुस्तान (भारत) हे दोन तुकडे झाले. एवढे होऊनही सख्या भाऊ असणाऱ्या पाकिस्तानने भारतावर १८४७ ला हल्ला केला. याबरोबर चीन सोबत १९६२, पाकिस्तान १९६४, १९७१,१९९९ इ. हल्ले केले. पण ते परवून लावून लायकी दाखवून दिली. १९९९ साली जेव्हा पाकिस्तानने भारतावर हल्ला केला तेव्हा भारताकडे पुष्कळ विमाने, दारूगोळा नव्हता.

भारताकडे सर्वात महत्त्वाचे म्हणजे GPS सिस्टिम नव्हती. GPS ( Globle Position System) आपले सैनिक कुठे आहे. हे ओळखण्यासाठी ही सिस्टिम वापरली जाते. आणि अमेरिकेने ती भारतास देण्यास नकार दिला. तेव्हा भारताने स्वत: चे GPS System  बनवले. ते GAGAN या नावाने. याचबरोबर भारताने आपल्याला तंत्रज्ञान देण्यास नकार दर्शवला तेव्हा भारतीय (मराठी) शास्त्रज्ञ विजय भटकर यांनी 'पहिल्या भारतीय सुपर संगणकाची' निर्मिती केली.

२०१५ साली भारताने क्रायोजेनिक इंजिन विकसित केले. तसेच १९९९ साली भारताने पोक्षरण येथे अनुचाचणी घेतली. आणि अणुधारक देश बनला. २००८ साली चंद्रयान, २०१४ साली मंगळयान, २०१७ साली एकाचवेळी १०८ उपग्रह अवकाश सोडले. आज भारतीय विज्ञान जगात सर्वश्रेष्ठ पैकी एक आहे. यामध्ये भारतीय शास्त्राज्ञांचा मोठा मोलाचा वाटा आहे. वर्गीस कुरियन यांनी धवल क्रांती, पंजाबात देशमुख यांनी हरित क्रांती घडवून आणली. याबरोबर दादासाहेब फाळके, व्हि. शांताराम यांनी मनोरंजन क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे.

अक्षय हुंडारे
एस.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा

# कल्पना सुंदर भारताची

आपल्या भारतात सर्वात उंच ठिकाणी जरी उभं राहिल तरी जास्तीत जास्त किती लांबचं दिसू शकतं? इतर देशापेक्षा तरी कमीच कारण इतर देशांपेक्षा भारत देशात प्रदुषणाचे प्रमाण खूप जास्त आहे. पहिल्यांदा तर नैसर्गिक साधनसंपत्तीचे वर्णन करणे गरजेचे आहे.

भारतात जलप्रदुषण, ध्वनीप्रदुषण व वायुप्रदुषण खुप मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. याला जबाबदार दुसरे कोणी नाही आपण मानवच आहोत. आपल्या भारतातील माणसाच्या मनात प्रत्येक गोष्टीची हाव, लोभ, आहे. आपल्या देशात स्वच्छता व शिक्षण असूनही अपुरेच पडताना दिसते. जगात उध्दवस्त करणाऱ्या अनेक घटना घडल्या ''आंधळी कोशिंबीर खेळताना पडणे साहजिकच आहे. पण पुन्हा उभं राहून पुढचा मार्ग अवलंबणे तितकेच महत्त्वाचं आहे.'' नाही का?

आजकालची तरूण पिढी खूप जास्त वेगवेगळ्या विचारसरणीची आहे. असं वाटतय आपल्या जगाच्या भल्याचा थोडा सुध्दा विचार करायला नको म्हणतात. मोठमोठ्या टि. व्ही., रेडिओ, मिरवणुका, मोबाईल यांच्या सारख्या गोष्टींचे आवाज स्वत: पुरते मर्यादित न ठेवता दुसऱ्यांना त्रास करतात. ध्वनी प्रदुषणामुळे कर्ण बधिरता येऊ शकते. देश छोटा असो वा मोठा देशाची प्रगती ही तिथल्या लोकांवर, लोकांच्या वागणुकीवर अवलुबून असते.

निर्सगाने जगाला भरपूर पाणी दिल्याचे जाणवते. तरीही पाणी टंचाईचे वास्तव नाकारता येत नाही. असे का? महाराष्ट्रातील पर्जन्यमान परिस्थिती खुप चांगली आहे. पाणी हे फुकट मिळते म्हणून त्याचे मोल कळत नाही. पाणी हे जीवन आहे किंवा पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे. या गोष्टी तर आता फक्त पुस्तकात वाचण्यापुरत्याच मर्यादित राहिल्यात असे वाटते. माणूस स्वत:च पाण्याचे प्रदूषण स्वत:च्या घरापासून करतो. घरातील घाण, कचरा, मलमूत्र, पाण्यात सोडून ह्याच अमूल्य राष्ट्रीय संपत्तीचे प्रदुषण करताना दिसतो. पाण्याची टंचाई भासू लागली की आपण सरकारला दोष देतो. पण हा विचार करत नाही. की ही वेळ आपण स्वत:च आपल्यावर ओढवून घेतोय. पाणी जपून वापरणे खरच काळाजी गरज आहे. माणूस पाणी प्रदूषित तर करतोच पण योग्य वापर करणे सुध्दा टाळतो. फुकटचे मिळते म्हणून अविचाराने उपयोग करतो. पण तेच पाणी खूप किंमत देऊन विकत घेतल्यानंतर त्याची खरी किंमत कळते आणि योग्य वेळी तितकाच वापर करतो.

विनोबाजी म्हणतात, ''तहान असेल तेवढे पाणी घ्या, आणखी हवे असेल तर पुन्हा मागा पण जास्त मागून बाकीचे फेकून देऊ नको. निसर्गाने दिलयं ते असं फेकून देण्यासाठी नाही तर कारणी लावण्यासाठी."

आपल्या भारतात विविध उद्योगधंद्यामुळे हवेचे प्रदुषणही मोठ्या प्रमाणात घडताना दिसते. हवेत धूर, विषारी वायू सोडल्याने हवेचे प्रदुषण होते. सण साजरे करणे आपली संस्कृती असे सांगत नाही की फटाके वाजवून हवेचे प्रदूषण करा. आजकालची पिढी सुशिक्षित समजदार असूनही स्वत:च स्वत:ला मृत्यूच्या दाढेत टाकण्याचा प्रयत्न करताना दिसते.

भारत या श्रीमंत देशामध्ये गरिब लोक राहतात ते स्वत:च्या वागणुकीमुळेच अन्न, पाणी, धन, वेळ या गोष्टी वाया घालवतात, ज्या कराणाने श्रीमंतसुध्दा गरीब होतील. आपल्या देशात प्रगती घडवून आणायची असेल तर स्वत: पासून स्व:च्या घरापासूनच सुरूवात करणे गरजेचे आहे.

देशाची प्रगती घडवून येण्यासाठी कल्पक राजनेत्यांची त्यांच्या चाणाक्ष बुध्दिची गरज आहे. जे आपल्या देशाला अभावानेच मिळालेले आहेत. देशाला सुदरतेची पदवी मिळेल की ते फक्त स्वप्नच राहणार. दुसऱ्या देशात पर्यटनासाठी जाण्यापेक्षा स्वत:च्या देशाला सुंदर बनवा आपण प्रत्येकाने प्रयत्न केला तर देश बदलायला व सुंदर बनवायला वेळ लागणार नाही. आणि हा बदल अशक्य ही नाही यासाठी हवी ती फक्त दुर्दम्य इच्छाशक्ती...

आजच्या तरूणाईकडे पाहून वाटते

''अंग्रेज तो चले गए मगर अंग्रेजियत छोड गए'' !

नागेश वाडेकर
एस.ई.मेकॅनिकल

# मुली वाचवा मुली शिकवा

आपल्या देशातील ०–६ वर्ष या वयोगटातील बालकांमधील प्रत्येक हजार मुलांमागे असलेल्या मुलींच्या जन्मदराचे म्हणजेच बाल लिंग गुणोत्तर प्रमाण १९६१ मध्ये असलेल्या प्रमाणापेक्षा दिवसेंदिवस कमी कमीच होताना दिसत आहे. (१९९१ मध्ये ९४५ तर २००१ मध्ये ९२७ आणि २०११ मध्ये ९१८) एवढा हा आश्चर्यजनक रीतीने कमी कमी होत जाणारा लिंगानुपात आहे. असे बालिका जन्मदराचे प्रमाण कमी होत जाने म्हणजे स्त्रिया अबला होत असल्यांचे हे चिन्ह आहे.

महिला सबलीकरण ऐवजी महिला अबलीकरण होत असल्याचेच ते निर्देशक आहे. हा बालिका अबलीकरण जन्मप्रमानाचा आकडा लिंग गुणोत्तर असे दर्शवितो की समाजात बाळाच्या जन्मापूर्वी हि लिंगपरिक्षण करून घेऊन कोणत्या बाळाला जन्म घेऊ द्यायचा हे ठरवले जाते. आणि जन्मानंतर हि मुलींना व मुलांना पूर्वग्रहानुसार वेगवेगळी वागणूक दिली जाते.

एका बाजूला मुलींना कमी लेखणारी मुलींच्या विरूध्द असलेली समाजरचना आणि दुसऱ्या बाजूला सहजरीत्या मिळू शकणारी परवडू शकणारी गर्भलिंगपरिक्षणाची सोय आणि त्यासवलतीचा गैर उपयोग करण्याची प्रतृत्ती यामुळे स्त्री – भ्रूण हत्येत वाढ होऊन बाल लिंग गुणोत्तर प्रमाण दिवसेंदिवस कमी होत गेलेले दिसते. या समस्येवर एकत्रितपणे काम करून एकमेकांशी सहकार्य करण्याची आवश्यकता जाणून घेऊन सरकारने 'मुलगी वाचवा, मुलगी शिकवा' ( बेटी बचाव बेटी पढाव) ही योजना सुरू केली आहे. मुलींच्या कमी होत जाणाऱ्या जन्मदराच्या समस्येत तोंड देण्यासाठी 'बीबी बीपी' ही योजना सुरू केली आहे. त्यामुळे आता ही देशव्यापी मोहिम, चळवळ बनली आहे. त्यासाठी कमी कमी होत जाणाऱ्या जन्मदाराच्या समस्येत तोंड देण्यासाठी बीबी बीपी ह्या योजनेला सरकारने मान्यता देऊन एक उपकारच केलाय असे म्हणले तरी चालेल. त्यामुळे त्या मुलींच्या जन्मदरानुसार मिळून १०० जिल्हे निवड करण्यात आले आहे. महिला व बालविकास मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय आणि मानव संसाधन मंत्रालय (MWCD, MHFW, MHRD) या तिनही मंत्रालयांनी एकत्र येऊन हि बीबीबीपी योजना राबविण्याचा एक उच्च दर्जाचा निर्णय राज्य सरकारने माझ्या बंधुभगिनींसाठी केला आहे.

बेटी बचाओ, बेटी पढाओ ( बीबीबीपी ) चळवळ जन्म कुटुंबात आनंदात साजरा करून तिचे स्वागत करणे तसेच तिच्या शिक्षणाची व्यवस्था करणे तिच्या शिक्षणाची जबाबदारी पार पाडणे यासाठी संपुर्ण देशभर राबवण्यात येणार आहे. स्त्रीभ्रूनाची हत्या न होता मुलीनी जन्म घ्यावा त्याने वाढवले जावे. शिक्षण दिले पाहिजे ह्या उद्देशाने हि चळवळ राबवली जाणार आहे. असे केल्याने मुलींना कुठल्याही भेदभावाशिवाय समान हक्क मिळवून द्यावा, या देशाच्या सक्षम, सबल नागरीक बनतील या चळवळीचा जोरदार प्रभाव पडावा म्हणून १०० जिल्हे निवडले आहेत. या १०० जिल्ह्यामधील सर्व संबंधितांना एकत्र आणून हि चळवळ जिल्हा स्तरावर, राज्य स्तरावर व देशव्यापी स्तरावर एकमेकांशी जोडली जाईल.

सरकारतर्फे देशपातळीवर ह्या प्रकल्पाच्या खर्चासाठी व योजनेसाठी अंमलबजावणीसाठी व बालविकास मंत्रालय जबाबदार असेल. राज्यस्तरावर महिला व बालविकास विभागाचे सचिव मार्गदर्शनाकडे करतील व जबाबदारी असतील ते हि योजना राबवून अंमलबजावणी करतील. सरकारतर्फे सुचवलेल्या ह्या योजनेचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल.

निवडलेले जिल्हे :१) राष्ट्रीय लिंगानुपानुसार देशातील सरासरी बालिका जन्मदर असलेले जिल्हे (८७ जिल्हे / २३ राज्ये)

२) जरी सध्या देधातील सरासरी बालीका जन्मदरापेक्षा अधिक जन्मदर आढळून येतात तरी पण हे प्रमाण कमी कमी होत असताना दिसत आहे असे जिल्हे (८ जिल्हे / ८ राज्ये).

आरोग्य व कुंटूंब कल्याण मंत्रालय आणि मानवी संसाधन मंत्रालयाच्या सल्ल्यानुसार विविध प्रकारचे कृती आराखडे आखले गेले आहेत बालिका जन्मदर सुधारण्यासाठी विविध स्तरांवर जिल्हे, राज्य ह्यांमुळे मोजणी होऊ शकणारे, निर्देशांक पूर्ण झालेली कामे यांच्या आकड्यानुसार सर्व संबधित लोकांना त्वरित कार्य करण्यासाठी एकत्र आणले जाईल.

राज्ये व केद्रशासित प्रदेश या एकत्रीकरणासाठी एका लवचिक चौकटीचा स्वीकार करतील. राज्य कृती दल स्थापन करून राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय विशिष्ठ योजना आखून ती साकार होऊन मोजता येईल असे लक्ष्य ठरवण्यात येईल. त्यासाठी देखरेख व सूचना देण्याचीही पध्दत अवलंबिली जाईल.

नितेश शिवशेटे
एस.वाय.मेकॅनिकल,डिप्लोमा

# बेटी बचाओ - बेटी पढाओ
# मुली वाचवा मुली शिकवा

हजारो वर्ष, हजारो पिढ्या मुलींना पूर्ण अंधारात ठेवलेल्या, शिक्षणापासून वंचित ठेवलेल्या मुलींचा एक–ना–एक दिवस प्रकाशमय अलिकडील काळात समाजानेच काय, पण सरकारला सुध्दा मुलींच्या बाबतीत विचार करावा लागला आणि तो म्हणजे

बेटी बचाओ – बेटी पढाओ.

हा केंद्रशासन पुरस्कृत कार्यक्रम राबविण्याचा ठरविले. आणि या योजनेची सुरूवात २२ जानेवारी २०१५ रोजी हरियाणामध्ये उद्घाटन करण्याचे कारण की, हरियाणा या राज्याचा स्त्री–पुरूष प्रमाण सर्वात कमी आहे.

मुलींचा जन्मदर कमी असलेल्या देशातील १०० जिल्हात सुरू केलेले आहे. यामध्ये राज्यातील १० जिल्ह्यांचा समावेश आहे. सदर कार्सक्रमाची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहे.

१) लिंग निवडीस प्रतिबंध करणे. २) मुलींच्या शिक्षणाबाबत खात्री देणे. ३) मुलींच्या जीवनमानाच्या सुरक्षेतेबद्दल खात्री देणे. बेटी बचाओ – बेटी पढाओ कार्यक्रम हा महीला व बालविकास मंत्रालय, सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालय, आणि मानव संसाधन विकास मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.

आपल्या देशामध्ये मुलगी म्हटले की, परक्याचे धन मुलगी जन्माला आली की, ती शिकली नाही पाहिजे. त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते. मुलगाच पाहिजे, वंशाचा दिवा हा आपल्या समाजातला व देशातला न्यूनगंड आज हळूहळू लोप पावत आहे. आजच्या काळामध्ये हजारो पिढ्यामध्ये मुलींनी सुध्दा पुरषांबरोबर कर्तृत्व करून दाखविले आहे. आजही मुलगी परूषांमध्ये पुढेच आहे. आज पण अनेक अशी माणसे आहेत की, मला मुलगी नको, मुलगाच हवा कारण की, तो वंशाचा दिवा आहे. तर मुलगी वंशाची पणती आहे. या दोन्ही बाजू एकच आहे. सरकारने लिंग भेद करायचा नाही म्हणून बेटी बचाव – बेटी पढाओ हा कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. मुलींच्या शिक्षणाकडे सरकारणे जास्त भर दिला आहे. आणि मुलींना – महिलांना त्यांच्या जीवनमानाच्या सुरक्षते बद्दल खात्री देण्याची हेच सरकारने बेटी बचाओ, बेटी पढाओ हा कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. परंतु आजच नाही पूर्वीच्या काळातही स्त्रीया ह्या पुरूषांपेक्षाही महान आहेत. हे त्यांनी त्यांच्या कर्तृत्वातून व कर्तबगारीतून दाखवून दिले आहे. अशी अनेक महिलांची उदाहरणे आहेत. ती पुढील प्रमाणे

स्त्री शिक्षणाच्या शिक्षिका, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले त्यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ मध्ये झाला. त्या काळातही शिक्षण नसतानाही त्यांनी खंबीरपणे समाजामध्ये स्त्रींचे महत्त्व पटवून दिले आहे. भारतीय स्त्रीशिक्षणाच्या जन्मदात्याा म्हणून त्यांची ख्याती अजरामर आहे. अशा थोर सावित्रीबाई फुले. यांचे नाव महाराष्ट्रीयन माणूस कधीच विसरणार नाही. ज्या काळात स्त्रीने घराबाहेर पडणे म्हणजे पाप समजले जात होते. सावित्रीबाईंनी प्रथम स्वत:हा शिक्षण घेतले व मुलींना शिकवू लागल्या. रुढी परंपरागत समजूतीने ग्रासलेल्या समाजाकडून अनेक अपमान व शिव्याशाप सोसून प्रसंगी दगड शेण यांचा मारा सोसूनदेखील त्यांनी माघार घेतली नाही. स्त्री शिकली पाहिजे. पुरूषाप्रमाणे स्त्रीलाही समान न्याय हक्क मिळाले पाहिजे तर समाज सुधारू शकतो. त्यांचे स्वत:चे मंगलसुत्र विकून स्त्री शिक्षणांची यशस्वी वाटचाल केली. समाजासाठी झटणाऱ्या थोर महात्मांच्या ओळीत त्यांना उत्तुंग मानाचे स्थान आहे.

राजमाता जिजाबाई छत्रपती शिवाजीमहाराज यांची आई आणि त्यांच्या मार्गदर्शक स्वत:च्या कर्तृत्वाने ज्यांचे आयुष्य किर्तीमंत ठरले अशा नामवंत स्त्रीया पुष्कळ आहेत. शिवाजीमहाराजांच्या बालमनावर त्यांचे संस्कार हिऱ्याला पैरू पाडण्यासारखे हे माता जिजाऊंनी कठीण काम केले आहे. महाभारत व रामायणातल्या आदर्श पुरूषांच्या, शौर्याच्या व न्यायाच्या कथा ती मुलाला रोज सांगे. तर दुसऱ्यापध्दतीने राजकारणाचे धडे जिजाबाईंनी दिले.

रणरागिणी मर्दानी झाशीची राणी थोर योद्धा भारताचे एकीकरण करण्यासाठी इंग्रजांविरूध्द लढा दिला. इंग्रजांच्या फौजेवर विजय मिळविला. मेरी झाशी नही दुंगी अशा खणखणीत इशारा इंग्रजांना दिला.

कस्तुरबा गांधी यांनी भारताला स्वच्छतेचा मंत्र दिला देशाच्या गोरगरीब जनतेच्या प्रशांना महत्त्व देऊ लागल्या. प्रसंगी अनेकवेळा त्यांनी तुरूंगवास भोगला.

सरोजिनी नायडू या भारताची बुलबुल म्हणून ओळखले जाते. भारतीय स्वातंत्र्य युध्दात आपले संपूर्ण आयुष्य देशसेवेला वाहिले. त्यात सरोजिनी नायडू या प्रथमपासूनच स्वातंत्र्य संग्रामात अग्रभागी होत्या. स्वातंत्र्य युध्दात परकीय सरकारच्या विरूध्द रणरागिणी झाल्या.

इंदिरा गांधी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या. त्यांनी गोरगरीब शेतकरी वर्गाला मायेचा हात दिला. परकीय मालावर बहिष्कार टाकला. त्यांनी लोकांसाठी अनेक योजना राबिवल्या.

ताराबाई भोसले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनंतर पूर्वीच्या एका महिलेने राज्यकारभार सांभाळला. त्या ही स्त्रिया कमी नव्हत्या त्यांनी त्यांची कर्त्तृत्व करून दाखविले आहे.

रमाबाई आंबेडकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणासाठी स्वत:चे दागिणे गहाण ठेवण्यासाठी दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देशकार्यासाठी रमाबाई आंबेडकरांनी आयुष्यभर मदत केली.

कर्मविर लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी वसतीगृह चालवण्यासाठी दिवाळीच्या सणादिवशी स्वत:चे दागिणे गहाण ठेवले.

कल्पना चावला या महिलेने चंद्रावर महिलांमध्ये पहिले पाऊल ठेवले. पहीली महिला अंतराळवीर महिला ठरली.

सुनिता विल्यम या महिलेने चंद्रावर दुसरी महिला म्हणून पाऊल ठेवले.

सुषमा स्वराज भारताची पहिली महिला म्हणून भारत सरकारमध्ये परराष्ट्रमंत्री पद भूषविले.

निर्मला सितारमण महिलेने भारत सरकारमध्ये पूर्णवेळ म्हणून केद्रींयं संरक्षण मत्री पदी कामे पाहिली.

प्रतिभाताई पाटील या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती झाल्या.

पी.टी. उषा ऑलिंपीकमध्ये पहिली महिला विजयी झाली म्हणून त्यांना स्वर्णकन्या ही पदवी मिळाली.

पी.व्ही.सिंध भारताची ऑलिंम्पीकमध्ये कुस्तीमध्ये पहिल्या महिला ठरल्या.

किरण बेदी IPS अधिकारी म्हणून भारताची पहिली महिला अधिकारी झाली.

सुनिता राऊत १०,००० मीटर धावणे स्पर्धेमध्ये ऑलिंम्पीकमध्ये आंतरराष्ट्रीयमध्ये ४ थी आली.

लता मंगेशकर यांना भारताच्या गान कोकिळा म्हणून ओळखले जाते.

अशा कितीतरी महिला या पुरूषांपेक्षाही अग्रेसर आहेत.

मग मुलगाच का हवा? मुलगी का नको? आई पाहिजे, बहिण पाहिजे, बायको पाहिजे, मावशी पाहिजे, शिक्षीका पाहिजे मग मुलगी का नको. अशा कितीतरी महिला या जगामध्ये, देशामध्ये महान आहेत.

